मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १९८ ■ रविवार, २९ मार्च २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# उद्योग परवानग्यांमध्ये सुलभतेसोबत महाराष्ट्रात वीजदरातही टप्प्याटप्प्याने घट होणार – मुख्यमंत्री

**मुंबई :** महाराष्ट्रात उद्योग सुलभतेसाठी परवानगी प्रक्रियेत मोठे बदल करण्यात आले असून 33 परवानग्यांपैकी 20 परवानग्या स्व-प्रमाणनावर (Self Certification) आणण्यात आल्या आहेत. उर्वरित 13 परवानग्यांची संख्याही लवकरच कमी करण्यासाठी प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली रामकी ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज आणि एमआयडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने 'बल्क ड्रग पार्क' व 'लाइफ सायन्सेस हब' उभारण्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, उद्योग प्रधान सचिव डॉ. पी.अन्बळगन, वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातील उद्योजक उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी उद्योजकांना विश्वासपूर्वक सांगितले की, राज्यातील वीजदर पुढील पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने कमी होणार आहेत. सध्या असलेला ₹10.88 प्रति युनिट हा वीजदर पुढील पाच वर्षात ₹15.87 पैसे इतका न होता कमी होऊन ₹9.97 पर्यंत येणार असून 2028-29 पर्यंत महाराष्ट्र देशातील सर्वात कमी वीजदर असलेले राज्य ठरणार असल्याचा दावा त्यांनी केला.




उद्योगांना सुलभ वातावरण देण्यासाठी 'मैत्री पोर्टल'ला सर्वसमावेशक अधिकार देण्यात आले असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मैत्री पोर्टलमुळे एकाच ठिकाणी सर्व परवानग्या मिळणार आहेत. या प्रक्रियेत पारदर्शकता ठेवत प्रत्येक अर्जाचा मागोवा घेता येणार असून, ठराविक कालावधीत सेवा न दिल्यास संबंधित यंत्रणांवर कारवाईची तरतूद करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.


हरित व शाश्वत पायाभूत सुविधा उभारण्यावर भर देण्यात येणार असून कॉमन इफ्ल्युएंट ट्रीटमेंट प्लांट (CETP), सर्क्युलर इकॉनॉमी आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करून उद्योगांना 'ग्रीन' बनविण्याचा प्रयत्न होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

या प्रकल्पात एमएसएमई उद्योगांनाही प्रोत्साहन देण्यात येणार असून मोठ्या उद्योगांसोबत त्यांच्या पुरवठादारांनाही सवलती देण्याची शासनाची भूमिका असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. शासन आणि खासगी क्षेत्राच्या भागीदारीत जागतिक दर्जाची, परवडणारी आणि स्पर्धात्मक उद्योग परिसंस्था निर्माण करण्यावर भर दिला जाणार असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

राज्यातील औद्योगिक धोरण अधिक गतिमान करत "नो नॉनसेन्स बिझनेस इज अवर स्ट्रॅटेजी इन बिझनेस" ही भूमिका घेत स्थिर व पारदर्शक वातावरण निर्माण करण्याचा शासनाचा निर्धार आहे. या उपक्रमातून महाराष्ट्र देशातच नव्हे तर जागतिक स्तरावर स्पर्धात्मक ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

---



**पाटोदा :- किंग पॅलेस, बीड येथे शेख शफीक रऊफ यांचा मुलगा इंजिनिअर शेख सैफ याच्या साखरपुडा कार्यक्रमाला उपस्थित राहुन शुभेच्छा देताना. आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे, पाटोदा नगर पंचायतचे माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक पठाण नय्युम भाई, माजी सभापती तथा नगरसेवक श्रीहरी गिते पाटील, शंकर तात्या जाधव.**

**(छाया - दैनिक युवक आधार पाटोदा.)**

## बौद्ध संस्कृतीचे अस्तित्व प्रियदर्शी सम्राट अशोकामुळे जीवंत



**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी तालुका प्रतिनिधी :** लाखनी- मुरमाडी /सावरी येथील महाप्रज्ञा बुद्ध विहारात प्रियदर्शी सम्राट अशोक जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली . अशोकाच्या काळात या देशात सोन्याचा धूर निघत होता प्रजा सुखी संपन्न होती बौद्ध विहार ही संकल्पना अशोकाची आहे . त्यांचे बौद्ध धम्मात शिल्प, शिलालेख, अशोकस्तंभ कोरलेला दिसतो. गुण आणि तत्वे हे प्रत्येक नागरिकांनी जोपासले पाहिजे. तलवारीच्या जोरावर जिंकलेले युद्ध हृदय परिवर्तन करुन बुद्धाच्या सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक वैचारिक संस्कृतीशी एकरूप होतात .या देशात धम्म रुजविण्यासाठी चौर्यांशी हजार विहारे बांधली आपली अपत्ये महेंद्र आणि संघमित्रा यांना श्रीलंकेत प्रचार आणि प्रसारासाठी पाठविले . त्यामुळे धम्माची तत्वे, ज्ञान, जगात पसरले. आज या जगामध्ये बुद्धांच्या संस्कृतीचे अस्तित्व प्रियदर्शी सम्राट अशोकामुळे जिवंत आहेत असे प्रतिपादन समता सैनिक दलाचे स्टॉप आफिसर गजेंद्र गजभिये यांनी व्यक्त केले . कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेंद्र बनसोड यांनी सांगितले की बुद्धाचा मार्ग म्हणजे प्रज्ञा, शील , करुणा, क्षमा ,शांती, मैत्री ही लोककल्याणकारी आहे अंधश्रद्धांना थारा नाही. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ रेवाराम खोब्रागडे व आभार विठ्ठल गणवीर यांनी केले.या प्रसंगी उपस्थित विनोद रामटेके, रमेश भोयर नामदेव काणेकर ,सदानंद वासनिक किशोर बनसोड, सुमन काणेकर, कमल गणवीर,वीणा डोगरे, साधना शिंगाडे, वर्षा तिरपुडे ,अक्षरा खोब्रागडे उपस्थित होते.

## भगवान महावीर जंयतीच्या दिवशी मांसविक्री केन्द्र बंद ठेवण्याबाबत मा . महापौर यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल :** दिनांक ३० मार्च सोमवार रोजी भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवानिमित्त त्या दिवशी पनवेल महानगर पालिका क्षेत्रातील कत्तलखाने, मांसविक्री केन्द्र व हिंसात्मक क्रीया बंद ठेवण्याबाबत काल दिनांक २७ मार्च रोजी पनवेल चे महापौर श्री नितीनभाई पाटिल , उपमहापौर श्रीमती प्रमिला ताई पाटिल यांना निवेदन देण्यात आले व याविषयांवर तत्काल उचित कार्रवाई करण्याची मागणी अखिल भारतवर्षिय दिगंबर जैन श्रमण सेवासंघ तर्फे श्री सुजित राजकुमार खोलापुरे यांनी केली. असेच निवेदन मा. आयुक्त व उपायुक्त परवाना विभाग- विभुते यांना पण देण्यात आले.

पनवेल महानगर पालिका क्षेत्रामध्ये तीन दिगंबर जैन समाजाचे भव्य जैन मंदिर( नविन पनवेल, खारघर व उलवे) असुन शेकडो भाविक या परिसरात वास्तव्यास आहेत. नविन पनवेल येथील श्री मुनिसुव्रतनाथ दिगंबर जैन मंदिरातुन सकाळी 7:30 वाजता भव्य शोभायात्रा, जुलुस निघणार आहे. अभिषेक , जन्मोत्सवाचा कार्यक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. मांसविक्री बंद ठेऊन महानगर पालिका तर्फे अहिंसेचे अवतार भगवान महावीर स्वामींना हीच खरी विनयांजली असेल असे खोलापुरे यांचे म्हणने आहेत व त्यांना प्रशासन तर्फे पुर्ण सहकार्य मिळेल असे उपायुक्त श्री विभुते यांनी सांगितले.




त्याचप्रमाणे पालिका प्रशासन तर्फे भ. महावीर यांचे विचार/ उद्बोधन यांचा प्रचार प्रसार मुख्य आठ-दहा ठिकाणी लावुन करण्यात यावा अशी देखील मागणी सकल जैन समाजाच्या वतीने श्री खोलापुरे यांनी केली आहेत.

---

## AI आधारित कॅन्सर तपासणी शिबिरामुळे आरोग्य जनजागृतीला चालना : सौ. ममताताई प्रितम म्हात्रे

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिका हद्दीत महिला व नागरिकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी राबविण्यात आलेल्या मोफत सामान्य आरोग्य व स्तन कर्करोग तपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. "आज केलेली एक छोटी तपासणी, उद्याचे आयुष्य सुरक्षित करेल" या संदेशातून जनजागृती करत, स्मार्ट हेल्थ AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) द्वारे हे शिबिर प्रभावीपणे पार पडले. पनवेल महानगरपालिकेच्या सर्व 15 नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रावरती सोमवार ते शनिवार सकाळी 9 ते दुपारी 2 वाजेपर्यंत पुढील 3 महिन्यांपर्यंत ही मोहीम राबवली जात आहे.

या शिबिरास पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समिती सभापती म्हणून मा. सौ. ममताताई प्रितम म्हात्रे यांनी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी उपस्थित डॉक्टर, आरोग्य कर्मचारी व नागरिकांशी संवाद साधून शिबिरामधील सुविधांची माहिती घेतली व महिलांनी अशा तपासण्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.




> **"महिलांनी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता वेळोवेळी तपासणी करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. लवकर निदान झाले तर अनेक गंभीर आजारांवर मात करता येते. पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून प्रत्येक घरापर्यंत अशा आरोग्य सुविधा पोहोचवणे हे आमचे उद्दिष्ट असून, प्रत्येक महिला व कुटुंब निरोगी राहावे यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत."**
>
> **सौ.ममताताई प्रितम म्हात्रे**
> **सभापती**
> **महिला बालकल्याण समिती प.म.पा.**

शिबिरामध्ये AI-आधारित स्तन कर्करोग तपासणी, रक्तदाब (बीपी) व रक्तातील साखर (शुगर) तपासणी तसेच इतर महत्त्वाच्या आरोग्य निर्देशकांची तपासणी करण्यात आली. विशेष म्हणजे, गर्भाशयमुख कर्करोगापासून संरक्षणासाठी मुलींसाठी एचपीव्ही लसीकरणाबाबतही जनजागृती करण्यात आली. यावेळी मुलींच्या आरोग्य रक्षणासाठी U-WIN डिजिटल प्लॅटफॉर्मवर नोंदणी करून एचपीव्ही लसीकरणाची सुविधा उपलब्ध असल्याची माहिती देण्यात आली. तसेच, शासकीय आरोग्य संस्थांमध्ये 14 वर्षे वयोगटातील मुलींना एचपीव्ही लस देण्यात येणार आहे असे सांगण्यात आले.महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून अशा उपक्रमांद्वारे नागरिकांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी पुढील काळातही विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचा विश्वास सभापती सौ.ममताताई म्हात्रे यांनी व्यक्त केला.

## महाविद्यालयाच्या संघाला सुवर्णपदक

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी**

**विलास गायकवाड :** क्रीडा व युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद धाराशिव व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय आट्यापाट्या स्पर्धा दिनांक 23 मार्च ते 26 मार्च 2026 या कालावधीत तालुका क्रीडा संकुल कळंब येथे पार पडल्या सदर स्पर्धेसाठी राज्यभरातून एकूण आठ विभागाच्या संघांनी त्यात सहभाग नोंदवला 17 वर्षे आतील मुलींच्या वयोगटातील पहिला सामना हा नाशिक विभाग विरुद्ध छत्रपती संभाजी नगर विभाग असा खेळावला गेला नाशिक विभागाने 40 विरुद्ध सात अशा गुणांच्या फरकाने दणदणीत विजय मिळवून राज्यस्तरीय स्पर्धेत विजयी सलामी दिली.




त्यानंतर स्पर्धेतील उपांत्य फेरीतील सामना हा नाशिक विभाग विरुद्ध नागपूर विभाग असा खेळावला गेला त्यात नाशिक विभागाने नागपूर विभागाला 31 विरुद्ध 7 असा नागपूर विभागाचा दणदणीत पराभव करून अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश मिळवला. राज्यस्तरीय स्पर्धेतील अंतिम सामना हा नाशिक विभाग विरुद्ध लातूर विभाग असा खेळावला गेला या शेवटपर्यंत रंगलेल्या चुरशीच्या सामन्यात पहिला सेट हा नाशिक विभागाने 34 विरुद्ध 14 असा जिंकला परंतु दुसऱ्या सेटमध्ये लातूर विभागाने पुनरागमन करीत दुसरा सेट हा 21 विरुद्ध 19 असा जिंकला व हा सामना निर्णायक अशा तिसऱ्या सेट पर्यंत गेला तिसऱ्या सेटमध्ये मात्र नाशिक विभागाच्या मुलींनी दमदार कामगिरीचे प्रदर्शन करीत यशस्वी पुनरागमन करून 28 विरुद्ध 18 असा सेट जिंकून राज्यस्तरीय आट्यापाट्या स्पर्धेच्या सुवर्णचषकावर आपले नाव कोरले व राज्यस्तरीय स्पर्धेत अजिंक्यपद पटकाविले. संघाच्या वतीने दिया पंडित, स्नेहा कासार, समृद्धी खाडे, गायत्री डोबे ,अस्मिता मते, गायत्री खांडवी यांनी उत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन केले. सदर खेळाडूंना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एस. जगदाळे सर उपप्राचार्या डॉ. सुचिता सोनवणे क्रीडा संचालक किशोर राजगुरू क्रीडा संचालक डॉ.दिनेश कराड यांचे मार्गदर्शन लाभले खेळाडूंच्या या यशाबद्दल महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेमार्फत मनःपूर्वक अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला. संस्थेचे जनरल सेक्रेटरी डॉ. प्रशांत हिरे, कोषाध्यक्षा डॉ. स्मिताताई हिरे, उपाध्यक्ष डॉ. हरीश आडके, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, विश्वस्त डॉ. संपदा हिरे व डॉ. अद्वय हिरे, महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा डॉ. योगिता हिरे, तसेच प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे, कनिष्ठ विभागाच्या उपप्राचार्या डॉ. सुचिता सोनवणे, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, विभागप्रमुख, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, व विद्यार्थ्यांनी यांनी अभिनंदन केले.

# मोहदरी ग्रामपंचायतीचा 'माहिती' देण्यास आडमुठेपणा

## भ्रष्टाचाराचा वास येत असल्याने ग्रामस्थांत संताप

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी / राजू गायकवाड** : गावाचा विकास आराखडा, खर्च झालेला निधी आणि विविध योजनांची माहिती अधिकृतपणे मागूनही ग्रामपंचायत प्रशासन माहिती देण्यास टाळाटाळ करत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वारंवार पाठपुरावा करूनही टाळाटाळ केली जात असल्याने ग्रामपंचायतीमध्ये मोठा भ्रष्टाचार दडला आहे का? असा सवाल आता ग्रामस्थ विचारू लागले आहेत. राजू गायकवाड यांनी ग्रामविकास अधिकारी यांना 4 फेब्रुवारी 2026 रोजी रीतसर माहिती मिळण्यासाठी लेखी अर्ज केला होता त्याच्या अर्जाची प्रतिलिपी गटविकास अधिकारी, मा.मुख्यकार्यकारी अधिकारी, यवतमाळ, मा. जिल्हाधिकारी यवतमाळ यांना केली होती एक महिना होऊनही त्यांनी माहिती दिली नाही त्या नंतर मा. गटविकास अधिकारी यांना ही oc जोडून माहिती द्यावी म्हणून विनंती अर्ज केला परंतु अजून माहिती दिली नाही यावरून असे समजते कि मोठा भ्रष्टाचार आहे त्यामुळे अधिकारी माहिती देत नाहीत लेखी अर्जामध्ये विकासकामांच्या खर्चाची पावती पुस्तके, मागील 5 वर्षांतील ऑडिट रिपोर्ट आणि पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीच्या विनियोगाची माहिती मागितली होती. मात्र, 'रेकॉर्ड उपलब्ध नाही' किंवा 'काम सुरू आहे' अशी उडवाउडवीची उत्तरे देऊन ग्रामसेवक आणि सरपंच माहिती देण्यास विलंब लावत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे गावात झालेली कामे आणि कागदावर दाखवलेला खर्च यामध्ये मोठी तफावत असल्याची चर्चा ग्रामस्था मध्ये दिसून येत आहे.जर मोहदरी ग्रामपंचायत चा कारभार स्वच्छ असेल, तर माहिती देण्यास प्रशासनाला भीती का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.आम्ही नियमानुसार माहिती मागितली आहे. महिना उलटूनही प्रशासन दाद देत नाहीये. जर येत्या काही दिवसांत माहिती मिळाली नाही, तर आम्ही गटविकास अधिकारी यांच्या कार्यालया समोर आंदोलन करू असा इशारा राजू गायकवाड यांनी दिला आहे दिला आहे.

# विहीर खोदकाम करणाऱ्या कष्टकरी कुटुंबातील मुलीची पोलिस भरतीत अव्वल कामगिरी; सोनाली गायकवाडचा प्रेरणादायी प्रवास

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : कष्ट, जिद्द आणि शिक्षणाच्या बळावर कोणतेही स्वप्न साकार होऊ शकते, याचा प्रत्यय नैताळे येथील सोनाली गायकवाड हिने देऊन दाखवला आहे. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत विहिरी खोदण्याचे काम करणाऱ्या कुटुंबातून आलेल्या सोनालीने पालघर जिल्हा पोलिस भरतीत विमुक्त जाती प्रवर्गातून प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

मुळ कर्नाटक राज्यातील साहेबराव गायकवाड व त्यांची पत्नी अनिता गायकवाड हे वडार समाजातील कष्टकरी दांपत्य रोजगाराच्या शोधात महाराष्ट्रात आले. सुरुवातीला अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील आनंदवाडी येथे वास्तव्यास असलेले हे कुटुंब नंतर नाशिक-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील नैताळे येथे स्थायिक झाले. गेल्या वीस वर्षांपासून त्यांनी विहिरी खोदण्यासारखे मेहनतीचे काम करत आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह केला.

आर्थिक अडचणी असूनही मुलांच्या शिक्षणात कुठलाही अडथळा येऊ नये, असा निर्धार त्यांनी कायम ठेवला. साहेबराव गायकवाड यांनी स्वतः एस.वाय.बी.ए. पर्यंत शिक्षण घेतले असले, तरी परिस्थितीमुळे त्यांचे शासकीय नोकरीचे स्वप्न अपूर्ण राहिले. मात्र त्यांनी आपल्या मुलांना



"शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे" ही शिकवण देत शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. अनिता गायकवाड यांचे शिक्षण सातवीपर्यंत झाले असले, तरी त्यांनीही मुलांच्या शिक्षणासाठी मोठे योगदान दिले.

सोनालीने प्राथमिक शिक्षण नैताळे येथील प्राथमिक विद्यालयात पूर्ण केले. त्यानंतर निफाड येथील न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळाच्या वैनतेय विद्यालय व महाविद्यालयात माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेतले आणि एस.वाय. बी.ए. पर्यंतचा अभ्यासक्रम पूर्ण केला. पुढे देशसेवा करण्याचा निर्धार करत तिने पोलिस भरतीसाठी विशेष प्रशिक्षण घेतले.

दिवस-रात्र अभ्यास, शारीरिक मेहनत आणि चिकाटी यांच्या जोरावर सोनालीने पालघर जिल्हा पोलिस भरतीत विमुक्त जाती प्रवर्गात प्रथम क्रमांक मिळवत कुटुंबाचे आणि परिसराचे नाव उज्ज्वल केले. तिच्या या यशाचे नैताळे परिसरासह सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

दरम्यान, सोनालीचा भाऊ ईश्वर गायकवाड हाही देशसेवेचे स्वप्न डोळ्यासमोर ठेवून प्रयत्नशील असून लवकरच भारतीय सैन्यात भरती होईल, असा विश्वास कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे.आपल्या मुलीचे स्वप्न साकार झाल्याचा आनंद साहेबराव गायकवाड यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत असून, त्यांच्या कष्टाला मिळालेले हे यश अनेक कुटुंबांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. सोनालीच्या या यशाबद्दल नैताळे ग्रामपंचायतीच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला. ही यशोगाथा केवळ एका कुटुंबाची नाही, तर समाजातील प्रत्येक पालक आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा देणारी ठरते आहे.

# भीमजयंती निमित्ताने भारतरत्न महामानव बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या उमरखेड नगरपरिषद ने घेतला सौंदर्यकरणाचा आढावा!

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी / राजू गायकवाड** : उमरखेड येथील भारतरत्न, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्ताने उमरखेड नगरपालिकेने घेतला आंबेडकरी चळवळीच्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत सौंदर्य करण्याचा आढावा.



या मध्ये डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला रंगरंगोटी करणे, हार घालण्यासाठी पायऱ्या तयार करणे, लाइटिंग आणि पाण्याच्या कारंजा नव्याने बसवणे, पुतळ्या परिसरामध्ये सर्व ठिकाणी लाइटिंग व फुलाची सजावट करणे, सर्व परिसर स्वच्छ करणे, पुतळ्याच्या मागच्या बाजूला एक 10 बाय 12 ची स्टोअर रूम बांधणे, झाडांना मोठ्या कुंड्या बसवणे यांच्यासह सोई सुविधेसाठी इतरही कामे करण्याची यावेळी उपस्थित बांधवांनी नगराध्यक्षा तेजश्री जैन यांचे प्रतिनिधी ॲड. संतोष जैन यांच्याकडे मागणी केली आहे.\

यावेळी सुभाषराव दिवेकर (सेवानिवृत्त डीवायएसपी), नगरसेवक ॲड.बाळासाहेब नाईक, पी एल आठवले, सभापती रसूल पटेल, विरेंद्र खंदारे, राहुल काळबांडे, पत्रकार सतीश कोल्हे, अतुल पाईकराव, पत्रकार सिध्दार्थ दिवेकर, भीमराव सोनुले, यशवंत काळबांडे, उत्तम शिंगणकर, दत्ता शिनगारे, महामुने यांच्या सह नगर परिषदेचे इंजिनियर व कर्मचारी उपस्थित होते.

# कबड्डी सराव शिबिराला लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांची सदिच्छा भेट

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** :' महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या तयारीसाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या पुरुष व महिला कबड्डी संघाच्या सराव शिबिराला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी सदिच्छा भेट देऊन खेळाडूंना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

यावेळी आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक शरद कदम, छत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर, संघ व्यवस्थापक प्रमोद म्हात्रे, सुनील पाटील, विनोद नाईक, विश्वनाथ पाटील, संकेत म्हात्रे, मंदार मुंबईकर, विपुल मोकल, पदाधिकारी आणि



खेळाडू उपस्थित होते. दिनांक २ एप्रिल ते ६ एप्रिल २०२६ दरम्यान सिन्नर (जि. नाशिक) येथे होणाऱ्या राज्यस्तरीय अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेसाठी रायगड जिल्हा संघाची सक्षम तयारी व्हावी, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर सराव शिबीर दररोज सकाळी ६ ते सकाळी ९ वाजेपर्यंत तसेच सायंकाळी ५ ते रात्री ८ वाजेपर्यंत क्रीडांगणावर होत असून दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी पुरुष व महिला कबड्डी संघ महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड स्पर्धेसाठी सिन्नर, नाशिक येथे रवाना होणार आहेत.

# श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना सभासदांच्या मनात समाधानाची लहर

**दैनिक युवक आधार**

**सणसर – विकास क्षत्रिय** : भवानीनगर परिसरातील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्यात गाळप हंगाम संपल्यानंतर प्रथमच एवढ्या प्रमाणात स्वच्छता राखली गेल्याचे दृश्य पाहून सभासदांच्या मनात आनंदाची लहर उसळली आहे.कारखान्याच्या परिसरात पसरलेली स्वच्छता ही केवळ व्यवस्थापनाची जबाबदारी नव्हे,तर सभासदांच्या मनाला दिलासा देणारी एक भावनिक अनुभूती ठरली आहे.

लासुर्णेचे वैभव लोंढे यांनी बारामतीला जाताना कारखान्याचा परिसर पाहिला आणि मन प्रसन्न झाल्याची भावना व्यक्त केली. त्यांच्या या अनुभवातून सभासदांच्या मनात कारखान्याबद्दलचा विश्वास अधिक दृढ झाल्याचे स्पष्ट दिसून आले.

चेअरमन पृथ्वीराज बापू जाचक,व्हा. चेअरमन कैलास गावडे आणि संपूर्ण संचालक मंडळाच्या पारदर्शक कारभारामुळे सभासदांनी दिलेली पोहच पावती ही त्यांच्या कार्यक्षमतेची खरी दाद आहे.शेतकऱ्यांबद्दल असलेला आदर,काटकसरी नियोजन आणि कारखान्याबद्दलची तळमळ यामुळे सभासदांमध्ये चर्चा रंगू लागली आहे की,"हा कारखाना पुन्हा एकदा महाराष्ट्रात नक्कीच नावलौकिक मिळवणार."

चालू हंगामात शेतकऱ्यांची बिले वेळेवर देणे कामगारांचा पगार महिन्याच्या महिन्याला अचूक नियोजनाने देणे या दोन्ही गोष्टींनी शेतकरी व कामगार वर्गाच्या मनात समाधान निर्माण केले आहे.सभासदांच्या समाधानाचा हा भावनिक प्रतिसाद म्हणजे संचालक मंडळाच्या पुढील वाटचालीसाठी एक प्रेरणादायी शक्ती ठरत आहे. ही बातमी केवळ स्वच्छतेची नाही,तर सभासदांच्या मनात निर्माण झालेल्या पृथ्वीराज बापू जाचक व संचालक मंडळाच्या विश्वासाची आणि कारखान्याच्या उज्ज्वल भविष्यासाठीच्या आशेची ठरत आहे.

# "जय श्रीराम" च्या गजरात दुमदुमली तुपटाकळी नगरी; रामनवमी उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस तालुका प्रतिनिधी/उमेश साखरकर** : आर्कषक फुलांनी सजलेली आणि विद्युत रोषणाई उजळलेले श्रीराम मंदीर संपूर्ण गावातील रस्त्यावर रांगोळी,दीपप्रज्वलन करून संपूर्ण सप्ताह तुपटाकळी नगरीत अयोध्या अवतरल्याचा भास होत होता १८८५ पासून चालु असलेली परंपरा गावकरी मोठ्या उत्साहाने जपत आहेत, संत महात्मे व समाजसुधारक यांच्या चरणस्पर्शाने पावन झालेल्या या पावन भूमीत प्रभु श्रीराम जन्मत्सोव सोहळा दरवर्षी प्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला

गुढीपाडव्यापासून अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथेची सुरूवात झाली. शिवपुराण कथा प्रवक्त्या ह. भ.प.गुरुदासी कु.परमेश्वरीदीदी परभने यांच्या मधुर वाणी मधुन व झांकी मधुन सर्वांना समजावून सांगितले दररोज कीर्तनचा कार्यक्रम सुरू असे यामध्ये संपूर्ण गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहत होते सकाळ पासूनच कार्यक्रम सुरू असायचा सकाळी अभिषेक,महाआरती,दुपारला शिवपुराण. आणि सायंकाळी गावातुन प्रभु श्रीरामचा







रथची मिरवणूक असे यामध्ये वारकरी संप्रदायातील भजन मंडळी, महीला भजन मंडळी व गावातील युवक यामध्ये सहभागी असत परंतु टाळकरी लहान बालके आर्कषक ठरले गावातील महिला मंडळी रस्ता स्वच्छ करून रांगोळी काढून दीपप्रज्वलन करून रथाची आरती ओवाळत असत लहान बालकापासुन वृद्धांपर्यंत सगळे या सप्ताहात हातातील कामे बाजूला ठेवून तनमन धनाने यामध्ये खारीचा वाटा उचलण्यासाठी नेहमी तयार असतात तालुक्यातील भाविक ही श्रीराम रामजन्मला मोठ्या प्रमाणावर हजर होते प्रभु श्रीराम जन्माचे हरी कीर्तन सेवा भागवताचार्य ह.भ.प.गुरवर्य शिवाजी महाराज चव्हाण यांच्या कडुन प्राप्त झाले रामजन्म मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला आणि सायंकाळी सहा वाजता गावातुन प्रभु ची शोभायात्रा काढण्यात आली यावेळी गावकरी टाळ मृदंगाच्या तालावर ठेका धरत, फुगडी घालत होते मिरवणुकी मधील भाविकांसाठी कुणी पाण्याची व्यवस्था केली तर कुणी मठ्ठा पी यायला दीला हे सर्व राममय झालेल वातावरण हे पाहून डोळ्यांचे पारणे फिटले २७ तारखेला काल्याचे कीर्तन झाल्यानतर महाप्रसादाला सुरवात झाली संपूर्ण गावकरी व परीसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने महाप्रसादाचा लाभ घेतला असुन असा भव्य दिव्य सोहळा पार पडला आहे

# उरणच्या माहीर पाटीलचा अरबी समुद्रात ऐतिहासिक थरार !; 12 किलोमीटर अंतर अवघ्या 4 तास 48 मिनिटातपार

**दैनिक युवक आधार**

**उरण शहरप्रतिनिधी सायली साळुंके** : उरण मधील तरुण जलतरणपटू माहीर परेश पाटील याने घारापुरी बेटावरून पहाटे पहाटे 5वाजून 5 मिनिटांनी अरबी समुद्रात उडी मारून तब्बल 12 किलोमीटर अंतर अवघ्या 4 तास 48 मिनिटे 21 सेकंदांत पूर्ण करून गेट ऑफ इंडिया मुंबई येथे पोहत जाण्याचा नवाविक्रम प्रस्थापित केला आहे.त्याच्या या अतुलनीय धाडस आणि चिकाटीचे कौतुक करीत उरण वासियांनी त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.



माहीरने पहाटे 5 वाजून 5 मिनिटांनी घारापुरी बेटावरून पोहण्यास सुरुवात केली. भर समुद्रात, पहाटेच्या अंधारात आणि लाटांच्या तडाख्याचे आव्हान स्वीकारत व सामना करत त्याने आपले ध्येय गाठले. या प्रवासात समुद्रातील प्रवाह, थंड पाणी आणि अंधार अशा अनेक अडचणींचा सामना त्याला करावा लगला असला तरी माहीरने आपलि जिद्द पूर्ण करून दाखवत पोहण्याच्या विश्वात एक नव्या विक्रमाची नोंद केली.

या धाडसी मोहिमेत माहीरला संतोष पाटील, राज संतोष पाटील, साई संतोष पाटील, जयेश अशोक पाटील, मयुरेश राजेंद्र पडते आणि हितेश भोईर यांच्यासह अनेक प्रशिक्षक व पर्यवेक्षकांचे मोलाचे सहकार्यमिळाले त्याच प्रमाणे नेव्हल आर्मामेंट डेपो, करंजा आणि शिवसेना (शिंदे गट) चे उपविभाग प्रमुख महेश पाटील यांचेही सहकार्य मिळाले.

माहीरच्या या मोहिमेचे निरीक्षण विनय शहा यांनी केले. या कामगिरीमुळे माहीरच्या कुटुंबात आणि समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याच्या कुटुंबात पूजा परेश पाटील, परेश किरण पाटील, आजी मंदा किरण पाटील, प्रसाद धर्माजी पाटील आणि आजी सुगंधा प्रसाद पाटील यांचा समावेश आहे. माहीरच्या या नव्या विक्रममुळे उरण परिसरासह संपूर्ण मुंबईत्याच्या प्रती अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.यावेळी भविष्यातही अशाच प्रकारेपोहण्याचे नवे विक्रम करून देशाचे नाव उज्ज्वल करण्याचा निर्धार माहीरनेयावेळी आमच्या प्रतिनिधी जवळ व्यक्त केला आहे.

# मार्च संपत आला तरी पनवेल पालिका हद्दीत नालेसफाईला सुरुवात नाही? निविदा प्रक्रिया सुरू

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : मार्च महिन्याचे काहीच दिवस शिल्लक आहेत. तरीदेखील पनवेल महानगरपालिका हद्दीतील नालेसफाईच्या कामांना सुरुवात झाली नसल्याचे दिसत आहे. माहितीच्या अधिकारात ही बाब उघड झाली असून पावसाळ्यापूर्वी नालेसफाई कामाची निविदा प्रक्रिया चालू असल्याची माहिती माहितीच्या अधिकारात देण्यात आली आहे. 2024 मध्ये मे महिन्यात पावसाला सुरुवात झाली होती, त्यामुळे यावर्षी नालेसफाईला कधी सुरुवात होईल असा सवाल आदित्य जानोरकर यांनी उपस्थित केला आहे. गतवर्षी 2024 मध्ये मे महिन्यात पाऊस सुरू झाला होता. याची कल्पना असताना देखील मान्सून पूर्व नालेसफाईच्या कामाची नियोजन प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. पावसाळा दोन महिन्यांवर आला असून पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीत मान्सूनपूर्व नालेसफाईला सुरुवात झालेली नाही.

**काही दिवसांवर पावसाळा आलेला आहे, असे असताना देखील नालेसफाईला अद्याप सुरुवात झालेली नाही. अनेक राज्यातून दुर्गम भागातून नागरीक उन्हाळ्यात कामाच्या शोधात पनवेलला येतात आणि कोणतेही काम कमी हजेरीत करतात. याचा फायदा कॉन्ट्रॅक्टर घेतो आणि कोट्यवधी रुपयांच्या नालेसफाईसाठी काढलेले टेंडरच्या कामांना या नागरिकांना जुंपले जाते. त्यामुळे व्यवस्थित नालेसफाई होत नाही. यावेळी किती लेबर लावता मलबा काढून लगेच घेऊन जाता की तिथेच ठेवता या सर्व गोष्टींवर लक्ष देऊन त्याची नोंद घ्यावी आणि कार्यवाही करावी**

**- आदित्य जानोरकर (सचिव, महाराष्ट्र प्रदेश युवक, शरद पवार गट, राष्ट्रवादी काँग्रेस)**

**मान्सूनपूर्व नालेसफाईची निविदा प्रक्रिया सुरू असून 31 मे पर्यंत ही नाले सफाई पूर्ण करण्याचे नियोजन आहे.**

**-वैभव विधाते, उपायुक्त, पनवेल पालिका**

पावसाळ्यात पाणी साचू नये यासाठी महानगरपालिकेतर्फे दरवर्षी पावसाळापूर्व कामांचा भाग म्हणून नालेसफाई करण्यात येते.

पालिका हद्दीत अद्याप देखील नाले सफाईच्या कामांना गती मिळाली नसल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. नालेसफाईला विलंब झालेला असल्याने कमी कालावधीत नाले सफाई पूर्ण करण्याचे आव्हान पनवेल पालिका प्रशासनासमोर उभे ठाकले आहे. वेळ कमी असल्याने ठेकेदार कशाही पद्धतीने नालेसफाई करतो तसेच गाळ आणि मलबा व्यवस्थित साफ करत नाहीत अशा घटना यापूर्वी देखील उघडकीस आलेल्या आहेत. दरवर्षी पावसाळ्यात पाणी तुंबण्याचा समस्यावरून पालिकेला तोंड द्यावे लागते.

## भानपूर जिल्हा परिषद शाळेत 'माजी विद्यार्थी व बाल आनंद मेळाव्याचे' उत्साहात आयोजन

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड /गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देण्यासाठी आणि गावातील शाळेच्या सर्वांगीण विकासावर चर्चा करण्यासाठी भानपूर येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्र शाळेत भव्य 'माजी विद्यार्थी व बाल आनंद मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले.









**शाळेच्या आठवणी आणि विकासाचा ध्यास**

आपल्या गावाच्या शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, जुन्या मित्र-मैत्रिणींशी संवाद साधणे आणि शाळेच्या भविष्यातील प्रगतीसाठी योगदान देणे, हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता. आज बुधवार, २५ मार्च रोजी सकाळी ११:०० वाजता शाळेच्या प्रांगणात हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण:

पुनर्मिलन: अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला.

चर्चासत्र: शाळेचा विकास कसा साधता येईल आणि विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सुविधा कशा पुरवता येतील, यावर उपस्थित मान्यवरांनी सविस्तर चर्चा केली.

बाल आनंद मेळावा: शालेय विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांत सहभाग नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. "तुमच्या उपस्थितीने हा दिवस अधिक आनंदमयी झाला आहे," अशा शब्दांत आयोजकांनी उपस्थितांचे आभार मानले.

## उरण तालुक्यातील आवरे येथील श्रावणी सोमवार आरती मंडळा तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर** : उरण तालुक्यातील आवरे गावात शुक्रवार दि.२७ मार्च २०२६ रोजी "विद्वान सर्वत्र पूज्यते" राजा त्याच्या राजवाड्यात पुजला जातो धनवान धनिक लोकांत मानला जातो परन्तु विद्वानाचा आदर ,मान ,सन्मान सर्वत्र केला जातो आजचे विद्यार्थी हे पुढची भावी पिढी देशाच्या प्रगतीत मोठा हातभार लागला जातो आधुनिक युगात प्रत्येक व्यक्तीला आपलं दर्जा आपलं सद्य स्थितीतील अस्तित्व टिकवायचं असेल तर आपण अद्यावत राहायला पाहिजे त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांनी सुद्धा तांत्रिक शिक्षणासोबत अद्यावत तांत्रिक ज्ञान घेणे आवश्यक आहे शिक्षण घेत असताना अभ्यासा सोबत यशोशिखरावर जात असताना विद्यार्थ्यांचे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणाऱ्या आई-वडिलांचे गोड कौतुक करणे हे खूप महत्त्वाचे असते प्रोत्साहनाने विद्यार्थ्यांच मनोबल



वाढत असते यासाठी श्रावणी सोमवार आरती समूह सुयश क्लासेस आवरे यांच्या संयुक्त विद्यमानाने आज श्री भोळेनाथ मंदिर आवरे येथे शैक्षणिक वर्ष २०२४ -२०२५ रोजी विशेष नैपुण्य मिळविण्याऱ्या दहावी तसेच बारावी कला वाणिज्य व विज्ञान शाखेत यशस्वी विद्यार्थ्यांचा समवेत प्रोत्साहित करण्याऱ्या आई-वडिलांचा चा गौरव व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र पदक व गुलाब पुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला तसेच श्री रामनवमी निमित्ताने सनातन चे साधक श्री योगेश ठाकूर सर यांचे श्रीरामचरित्रपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते या व्याख्यानात प्रभु श्रीराम यांची आदर्श राजा मर्यादापुरुषोत्तम राजा एक बाणी , एकवचनी, एकपत्नी राज्यपद्धती , त्याग सेवा व आयुष्यातील विविध असे प्रसंग यावर व्याख्यान पार पडले असंख्य अशा राम भक्तांनी सदर व्याख्यांनाचा लाभ घेतला तत्पुर्वी आत्माराम ठाकूर मिशन व जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कुल आवरे चे संस्थापक अध्यक्ष अशोक ठाकूर सर यांना भावपूर्ण श्रद्धांजली सर्व शिवभक्त व त्यांच्यावर स्नेह दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांनी वाहिली सदर कार्यक्रम प्रसंगी श्रावणी सोमवार आरती समूहाचे सर्व सदस्य व आवरे गावातील शिवभक्त हे शिव मंदिरात उपस्थित होते.या प्रसंगी कुमुदिनी गावंड,नर्मदा गावंड ,दुर्गा गावंड ,ताई गावंड, श्री शिवकुमार म्हात्रे,शंकर पाटील,अतिष गावंड,निलेश गावंड,राकेश गावंड,अरुण गावंड, विजेता पाटील,राजेश गावंड ,जनार्दन गावंड, कमलाकर गावंड ,गणीबाई म्हात्रे,पत्रकार सुभाष कडू,विक्रम गावंड ,हितेश गावंड, वर्षा ठाकूर तसेच आवरे गावतील ग्रामस्थ शिवभक्त या वेळी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रो.प्रशांत म्हात्रे सर यांनी केले अश्या प्रकारे श्रावणी सोमवार आरती तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला.

## ८ वर्षांच्या नक्ष राहुल पडतेचा ऐतिहासिक पराक्रम! घारापुरी ते गेटवे ऑफ इंडिया १२ किमीचे अंतर ४ तास ४३ मिनिटांत पार

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी. भोईर** : उरण तालुक्यातील तडफदार जलतरणपटू नक्ष राहुल पडते यांनी केवळ ८ वर्षांच्या अतिशय लहान वयात अरबी समुद्रात अभूतपूर्व असा पराक्रम करत नवा इतिहास रचला आहे. नक्षने आपल्या आजोबांचे गाव घारापुरी बेट (Elephanta) येथून गेटवे ऑफ इंडिया पर्यंतचे तब्बल १२ किलोमीटर अंतर अवघ्या ४ तास ४३ मिनिटांत पूर्ण करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. रात्री ४.२७ वाजता घारापुरी जेटीवरून उडी घेत नक्षने गडद अंधार, समुद्रातील लाटा आणि थंड पाण्याला सामोरे जात ही मोहीम यशस्वी केली. प्रचंड चिकाटी, सहनशक्ती आणि धैर्याच्या जोरावर या बाल जलतरणपटूने समुद्राला अक्षरशः छेद दिला.



या मोहिमेत नक्षचे आई सुकन्या राहुल पडते आणि वडील राहुल कमलाकर पडते हे भारतीय नौसेना दलात ( nsod dockyard )येथे कार्यरत असून सर्वं पडते परिवार , तसेच डोंगर आळी ग्रामस्थ मंडळ यांनी मोठे प्रोत्साहन दिले. त्याला अनुभवी प्रशिक्षक संतोष पाटील, आणि त्यांचा गट जयेश अशोक पाटील, राज संतोष पाटील, साई संतोष पाटील आणि हितेश भोईर यांचे मार्गदर्शन लाभले. संपूर्ण प्रवासावर पर्यावेक्षक विनय शहा यांनी देखरेख केली. नक्षच्या या कर्तृत्वामुळे त्याच्यासमोर इंग्लिश चॅनेल सारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आव्हानांचे दरवाजे आता खुले झाले आहेत. उरण तालुक्यातील अनेक तरुण जलतरणपटूंना या कामगिरीने प्रेरणा मिळाली आहे.या कार्यक्रमाला माजी सरपंच आशिष तांबोळी आणि माजी सरपंच दीपेश कोळी प्रमुख उपस्थित होते. सेंट मेरी कॉन्व्हेंट हायस्कूलनेही नक्षला संपूर्ण पाठींबा दिला.

## लालपरी (एसटी) विषयी महाराष्ट्राची आस्था वर्षानुवर्षे टिकलीय - साहित्यरत्न प्रा.एल.बी.पाटील

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी. भोईर** : उरण एसटी डेपोमध्ये एसटी विषयी आस्था आणि एसटी महामंडळाची व्यवस्था याविषयावर आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे साहित्यरत्न रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील आपल्या भाषणात म्हणाले की महाराष्ट्रातील मोठ्या शहरांपासून लहान खेड्यात लालपरी एसटीच्या भावनां आपुलकीच्या राहिल्या आहेत.त्यामुळे प्रत्येक माणसात एसटी विषयी आस्था असून खेडोपाड्यात एसटी थांबून नात्याप्रमाणे व्यवस्था मंडळाने.केली आहे.









डेपोचे आजचे व्यवस्थापक गद्रे, यांनी प्रास्ताविक करून पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी जेएनपीए फायनान्सचे डेप्युटी मॅनेजर महादेव घरत यांच्या सामाजिक सेवेबद्दल डेपो तर्फे सत्कार करण्यात आला. धनंजय पाटील यांनी सुरेख सूत्रसंचालन केले. यावेळी विषयानुरूप शासनमान्य नशाबंदी विरोधात प्रचारक लवेंद्र मोकल यांनी. " माझी एसटी", आदर्श शिक्षक संजीव पाटील यांनी " घातक नशा तंबाखूची " एड मच्छिंद्र घरत यांनी अभ्यासपूर्ण तंबाखूवर व्याख्यान दिले तर अनामिका राम या हिंदी भाषिक कवयित्रीची " लाल परी " ही कविता सादर करून एसटी कर्मचाऱ्यांना आनंद दिला. धनंजय पाटील यांनी पाहुण्यांचे आभार मानले.

## सणसर येथे युनिटी हॉस्पिटल बारामती तर्फे मोफत आरोग्य तपासणी व सल्ला शिबीर


**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील सणसर येथे युनिटी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल बारामतीतर्फे रविवार २९ रोजी मोफत तपासणी व सल्ला शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिरात हृदयरोग, उच्च रक्तदाब (बीपी),किडनी विकार,मधुमेह,पोटाचे आजार तसेच कान,नाक, घसा यांसारख्या आजारांवर तज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी व सल्ला दिला जाणार आहे.या शिबिरात बीपी तपासणी, ईसीजी,रक्तातील साखर तपासणी केली जाणार असून रूग्णांना हॉस्पिटल बिल व तपासणीत विशेष सवलत दिली जाणार आहे.यावेळी एम.डी.तज्ञ डॉक्टरांकडून हृदयरोग व मधुमेह तपासणी एम.एस.जनरल सर्जन तज्ञांकडून पोट व आतडे विकार तपासणी एम.एस. कान-नाक-घसा तज्ञांकडून बहिरेपणा,सायनस व चक्कर तपासणी करण्यात येणार आहे या शिबिराचे आयोजन पालखी तळ,सणसर येथे करण्यात आले असून शिबिराचा लाभ घेण्यासाठी परिसरातील जास्तीतजास्त नागरिकांनी उपस्थित राहावे,असे आवाहन युनिटी हॉस्पिटलतर्फे करण्यात आले आहे.

## पंचमुखी हनुमान प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात संपन्न ; पंचकुंडात्मक रुद्र व हरिकीर्तनांनी भक्तिमय वातावरण

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव येथे श्री पंचमुखी हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा व पंचकुंडात्मक रुद्र महायज्ञ सोहळा दि.२४ ते २७ मार्च २०२६ दरम्यान अत्यंत भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या भव्य धार्मिक सोहळयामुळे संपूर्ण परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते. या प्रसंगी सौ.ज्योतीताई काळे यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की,"आमच्या हातून हे महत्त्वपूर्ण कार्य घडून आले, हा आमच्यासाठी मोठा आनंदाचा व अभिमानाचा क्षण आहे.अशा कार्यासाठी योग लागतो आणि तो योग आज सर्वांच्या साक्षीने साध्य झाला."सोयगाव येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाची स्थापना कैलासवासी बाबुरावजी काळे (माजी मंत्री) यांनी सन १९७० मध्ये केली होती. सोयगाव तालुक्याच्या निर्मिती व विकासामध्ये त्यांचे मोठे योगदान असून त्यांचे कार्य पुढे नेण्यासाठी काळे कुटुंबीय प्रयत्नशील आहेत. महाविद्यालयाच्या प्रांगणातील पुरातन मारुती मंदिराच्या जीर्णोद्धारासाठीही पुढाकार घेण्यात आला असून,त्याच ठिकाणी पंचमुखी हनुमान मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली.सोहळ्याची सुरुवात दि.२४ मार्च रोजी नगरप्रदक्षिणा व भव्य शोभायात्रेने झाली.त्यानंतर प्रायश्चित्त संकल्प,गोपूजन, विष्णुपूजन आदी विधी पार पडले.दि.२५ मार्च रोजी गणेश पूजन,पुण्याहवाचन,मातृका पूजन,नंदीश्राद्ध,कुंडपूजन,देवता स्थापना,मंडप पूजन तसेच मूर्ती जलाधिवास,पूजा-अर्चा व नैवेद्य



विधी संपन्न झाले.दि.२६ मार्च रोजी प्राणप्रतिष्ठेपूर्वी प्राणपूजन, हवन, न्यास,धान्यनिवास,शयननिवास,

सायंकाळी आरती व पूजा करण्यात आली.तर दि.२७ मार्च रोजी मुख्य प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण विधी सर्व भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.या निमित्ताने दररोज रात्री हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये हरिभक्त परायण विक्रम महाराज (मुक्ताईनगर),अजबराव महाराज (मिरगे),लखन महाराज (चिंचखेडा, जामनेर) व राजेंद्र महाराज साबळे यांची कीर्तन-प्रवचने झाली.या कार्यक्रमांना सोयगाव व पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.या प्रसंगी मंचावर अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ नाना काळे,सचिव प्रकाश दादा काळे,जिल्हा परिषद सदस्य सौ. पुष्पाताई काळे, शिवदीप भैया काळे, रोहित भैया काळे,सुनयना ताई काळे,तेजस्विनी ताई काळे,प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,स्थापत्य अभियंता श्याम पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.शंतनु चव्हाण यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ शिरीष पवार यांनी मानले.या भव्य सोहळ्यामुळे सोयगाव परिसरात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून,सर्व भाविकांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीपणे पार पडल्याबद्दल आयोजकांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.

## चॅम्पियन्स कराटे क्लबतर्फे भव्य अँडव्हान्स फिटनेस कॅम्पचे आयोजन, हजारो विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या संस्थेची उल्लेखनीय कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित** : चॅम्पियन्स कराटे क्लबचे संस्थापक शिहान संतोष मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली स्पोर्ट कराटे, सेल्फ डिफेन्स,फिटनेस कॅम्प, प्रशिक्षण व करिअर मार्गदर्शन शिबिर उत्साहात पार पडले. 2000 साली स्थापन झालेल्या या संस्थेने आजपर्यंत तब्बल चार ते पाच हजार विद्यार्थ्यांना कराटेचे प्रशिक्षण देत त्यांच्यात आत्मविश्वास आणि शिस्त रुजवली आहे.



या संस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे गेल्या दहा वर्षात महाराष्ट्र राज्य साठी सर्वात जास्त नॅशनल मेडल विजेते खेळाडू संघटनेने तयार केले आहेत, गेल्या काही वर्षांतच 50 पेक्षा अधिक राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील पदक विजेते विद्यार्थी या संस्थेतून तयार झाले आहेत. कराटे या खेळाला आता शासकीय मान्यता मिळाल्यामुळे पदक विजेत्या विद्यार्थ्यांना शासकीय नोकऱ्यांमध्ये आरक्षणाचा लाभ मिळत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

संस्थेच्या विद्यार्थ्यांनी साऊथ एशियन गेम्स, नॅशनल स्कूल गेम्स, वेस्ट झोन युनिव्हर्सिटी स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाड येथील तेजस्वी वाळंज हिची एशियन गेम्ससाठी ट्रायल साठी निवड झाली असून यावर्षी म्हसळा सोहेल तांबे आणि विक्रांत खांडेकर याने नॅशनल स्कूल गेम्समध्ये सुवर्णपदक आणि रौप्य पदक पटकावले आहे, ही संस्थेसाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

या शिबिरात रायगडसह विविध जिल्ह्यांमधून 60 विद्यार्थी सहभागी झाले होते. शिहान संतोष मोहिते यांच्यासोबत रितेश मुरकर व अविनाश मोरे ,प्रसाद सावंत यांनी विद्यार्थ्यांना फिटनेस, ॲडव्हान्स ट्रेनिंग तसेच करिअर मार्गदर्शनाबाबत सखोल प्रशिक्षण दिले. कराटेमध्ये 'काता' आणि 'कुमिते' या प्रकारांचे प्रशिक्षण देण्यात येत असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जात आहे.

विशेषतः मुलींसाठी सेल्फ डिफेन्स अत्यंत आवश्यक असल्याचे सांगत अधिकाधिक युवक-युवतींनी कराटेकडे वळावे, स्वतःचे संरक्षण करावे आणि शारीरिक तंदुरुस्ती राखावी, असे आवाहन शिहान संतोष मोहिते यांनी केले.संस्थेने आजवर अनेक यशस्वी खेळाडू घडवले असून भविष्यातही ही परंपरा कायम ठेवण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## विद्यार्थ्यांची शेतमळ्यात क्षेत्रभेट; आधुनिक शेतीचे घेतले प्रत्यक्ष ज्ञान

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे भंडारा प्रतिनिधी** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सर्पेवाडा येथील विद्यार्थ्यांनी दिनांक २७ मार्च २०२६ रोजी 'परिसर क्षेत्रभेट' उपक्रमांतर्गत शेतमळ्याला भेट देत शेतीविषयक प्रत्यक्ष ज्ञान आत्मसात केले.या क्षेत्रभेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी भात, ऊस, मुग, मका, कांदा, लसूण तसेच विविध पालेभाज्या या पिकांची सविस्तर माहिती जाणून घेतली. शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांनी पिकांची लागवड, निगा आणि उत्पादन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन घेतले. याचबरोबर शेतीला पूरक व्यवसाय, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर तसेच सौरऊर्जेच्या माध्यमातून होणारा पाणीपुरवठा याविषयीही विद्यार्थ्यांनी माहिती घेतली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना




प्रत्यक्ष अनुभवातून शेतीचे महत्त्व समजले.या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री. विलास दिघोरे, कु. मीना रामटेके, श्री. रामभाऊ गेडाम तसेच सहायक शिक्षक श्री. उज्वल सुखदेवे उपस्थित होते.या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

## श्रद्धा,सेवा आणि सौंदर्याचा संगम— सणसरच्या भैरवनाथ मंदिरात रंगकाम पूर्ण



**दैनिक युवक आधार**

**सणसर /विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील सणसर गावातील श्री भैरवनाथ मंदिर हे गावकऱ्यांच्या श्रद्धेचे आणि एकतेचे प्रतीक आहे. मागील वर्षी लोकवर्गणीतून जमा झालेल्या निधीतील शिल्लक रकमेचा उपयोग करून मंदिराचे सुशोभीकरण व रंगकाम करण्यात आले. मंदिराच्या भिंतींवर नव्या रंगाची झळाळी चढताच संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

ग्रामस्थांनी यात्रा कमिटीचे अध्यक्ष मा अक्षय निंबाळकर खजिनदार मिथुन बारवकर व सर्व सदस्यांचे मनःपूर्वक आभार मानले.त्यांच्या निस्वार्थी सेवेमुळे गावकऱ्यांच्या श्रद्धेला नवे रूप लाभले आहे.मंदिराच्या सौंदर्यवृद्धीमुळे भक्तांना आध्यात्मिक समाधान तर मिळालेच,पण गावातील सामाजिक एकतेलाही नवे बळ मिळाले. गावकऱ्यांनी व्यक्त केलेले समाधान आणि कौतुक हेच यात्रा समितीच्या कार्याचे खरे पारितोषिक ठरले.श्री भैरवनाथाच्या कृपेने गावातील भक्तीभाव,एकजूट आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होईल,अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# सम्राट अशोक-फुले-आंबेडकर जयंती उत्सव समिती २०२६ जाहीर !

## अध्यक्षपदी विशाल खरात सर तर विविध पदाधिकाऱ्यांची कार्यकारणी गठीत

**दैनिक युवक आधार**

**श्री सिद्धार्थ धंदरे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी** : सम्राट अशोक, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य उत्सव साजरा करण्यासाठी "सम्राट अशोक-फुले-आंबेडकर जयंती उत्सव समिती २०२६" ची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. या समितीत विविध क्षेत्रातील अनुभवी, तरुण व सामाजिक भान असलेल्या कार्यकर्त्यांना संधी देण्यात आली असून, यंदाचा उत्सव अधिक व्यापक आणि प्रभावी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

समितीच्या अध्यक्षपदी विशाल लहानु खरात यांची निवड करण्यात आली असून, सचिवपदी ॲड. राजेश देवराव जाधव, तर कोषाध्यक्षपदी सुमेध नारायण जाधव यांची जबाबदारी सोपविण्यात



आली आहे. सहसचिव म्हणून राजेंद्र सुरडकर व संजय उत्तमराव जाधव यांची निवड करण्यात आली आहे.

उपाध्यक्षपदी आर.डी. गवई, सुहास हिवाळे, व्ही.टी. गवई, दत्ताराव चव्हाण , दिपीन इंगळे, सचिन कस्तुरे, पत्रकार छोटु कांबळे, दादाराव सोनटक्के, अजय साळवे व विकास चव्हाण यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा समावेश करण्यात आला आहे.

संघटक म्हणून संकेत जाधव, रवि वाकोडे, विनोद बोर्डे, विनोद कळसकर, राजेश बोर्डे, विलास जाधव, विशाल भंडारे, निलेश साळवे, आनंद गवई, शुभम जाधव, प्रशांत इंगळे, चेतन भालेराव, अतुल साळवे, गौरव इंगळे, रोहित पेंढारकर, रिक्की काकडे, विष्णु मेथे, आकाश महाजन आदींचा सक्रिय सहभाग राहणार आहे.

प्रसिद्धी प्रमुख म्हणून संजय निकाळजे, प्रशांत डोंगरदिवे, विजयकांत गवई, प्रविण डोंगरदिवे, विनोद पवार यांची निवड करण्यात आली आहे. तर बॅनर व सोशल मीडिया प्रमुख म्हणून सिद्धार्थ धंदरे, राहुल पवार, ऋतिक शिनगारे व मिलींद जाधव (आर.जे. पुणे) कार्य पाहणार आहेत.

महिला संघटक म्हणून दुर्गाताई चव्हाण, अश्विनीताई जाधव, सुप्रियाताई भटकर, सोनीताई भिसे, मयुरीताई जाधव, रत्नमाला सिरसाठ, जयाताई आराख, शालिनी वानखेडे, शिलाबाई जाधव व प्रमिलाताई जाधव यांचा समावेश आहे.

सांस्कृतिक व शिस्तपालन समितीत डॉ. शाम वाघ, प्रविण खरात, सुधीर जाधव, सुशील शिनगारे, विकास कस्तुरे, राहुल राऊत, सचिन सोसाले, देवानंद साळवे आदींचा समावेश करण्यात आला आहे.

या समितीच्या माध्यमातून समाजप्रबोधन, विचार जागृती, सांस्कृतिक कार्यक्रम, मिरवणुका तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असून, शेकडो सदस्य, सल्लागार व मार्गदर्शक यांच्या सहकार्याने हा उत्सव अधिक भव्यदिव्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

## महागाव येथे श्रीराम नवमी उत्साहात साजरी; श्रीराम जन्मोत्सव समितीचे नियोजनबद्ध आयोजन

**दैनिक युवक आधार**

**एम डी सूरोशे/महागांव यवतमाळ** : भगवान श्रीरामांचा जन्मोत्सव म्हणून साजरी होणारी रामनवमी महागाव शहरात यंदाही मोठ्या उत्साहात, भक्तिभावाने आणि पारंपरिक पद्धतीने साजरी करण्यात आली. श्रीराम जन्मोत्सव समिती महागांव यांच्या पुढाकाराने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील राममंदिरांसह प्रमुख ठिकाणी सकाळपासूनच भक्तांची मोठी गर्दी उसळली होती.

चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या नवमी तिथीला भगवान श्रीरामांचा जन्म झाला, अशी धार्मिक मान्यता आहे. भगवान विष्णूंचा सातवा अवतार म्हणून श्रीरामांचे स्थान हिंदू धर्मात अत्यंत महत्त्वाचे मानले



जाते. या पवित्र दिनाचे औचित्य साधून महागाव शहरात सर्वत्र भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

रामनवमीच्या निमित्ताने शहरातील विविध राममंदिरांमध्ये सकाळी अभिषेक, पूजा आणि आरती करण्यात आली. दुपारच्या सुमारास रामजन्माचा सोहळा पार पडताच "जय श्रीराम"च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. अनेक भक्तांनी उपवास करून या दिवशी भगवान श्रीरामाच्या नामस्मरणात वेळ व्यतीत केला.

या दिवशी रामायण पठण, भजन-कीर्तन आणि धार्मिक प्रवचनांचे आयोजन करण्यात आले होते. विविध मंडळांच्या वतीने हरिनाम सप्ताह, भजन कार्यक्रम आणि सामूहिक आरतीचे आयोजन करण्यात आले. यामुळे शहरात दिवसभर धार्मिक उत्साहाचे वातावरण कायम राहिले. रामनवमीच्या दिवशी चैत्र नवरात्रीची सांगता होत असल्याने या दिवसाला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त आहे. देवी उपासना आणि श्रीराम जन्मोत्सव यांचा संगम या दिवशी अनुभवायला मिळाला. मंदिर परिसरात आकर्षक सजावट, फुलांची आरास आणि रोषणाई करण्यात आली होती. लहान मुलांपासून ते जेष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी या उत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

**श्रीराम जन्मोत्सव समिती महागाव यांनी भक्तिमय वातावरणात**

महागाव शहरात श्रीराम नवमी निमित्त ढोल ताशाच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली होती.या कार्यक्रमाचे नियोजनबद्ध आणि शिस्तबद्ध आयोजन केले. स्वयंसेवकांनी व्यवस्थापनाची जबाबदारी उत्तम प्रकारे पार पाडत भक्तांना कोणतीही अडचण भासू दिली नाही.

रामनवमीसारखे सण केवळ धार्मिक श्रद्धेपुरते मर्यादित नसून समाजातील एकोपा, संस्कार आणि नैतिक मूल्ये दृढ करण्याचे माध्यम आहेत. भगवान श्रीरामांचे आदर्श जीवन, कर्तव्यनिष्ठा आणि धर्मपालन यांचा संदेश आजच्या समाजालाही मार्गदर्शक ठरतो. अशा सणांच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य वाढून सकारात्मक वातावरण निर्माण होणे ही काळाची गरज आहे.

## बांधकाम कामगारांच्या हक्कांसाठी सिल्लोड सोयगाव मध्ये समिती सक्रिय

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे** : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई.कडुन सिल्लोड-सोयगाव विधानसभा मतदारसंघ बांधकाम कामगार स्थानिक सनियंत्रण समिती गठीत करण्यात आली. समिती पुढील पदसिद्ध अध्यक्ष आमदार अब्दुल सत्तार तसेच सर्व नवनियुक्त सदस्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.यावेळी आमदार अब्दुल सत्तार,सदस्य राजेंद्र ठोंबरे (पुरुष बांधकाम कामगार प्रतिनिधी)दुर्गाबाई पवार सदस्य (महिला बांधकाम कामगार प्रतिनिधी) तसेच सोयगाव तालुक्याला सुद्धा प्रतिनिधी मिळाले आहे.शहरातील नगरसेविका आशियाना कदीर शहा सदस्य (महिला बांधकाम कामगार प्रतिनिधी)दत्ता शेजुळ सदस्य (बांधकाम क्षेत्रातील मालक प्रतिनिधी) फर्दापूर येथील एकनिष्ठ पदाधिकारी विलास काका वराडे सदस्य (बांधकाम क्षेत्रातील मालक



प्रतिनिधी) बांधकाम कामगारांच्या हक्कांसाठी व विकासासाठी आपली वाटचाल यशस्वी होवो, हीच शुभेच्छा! देण्यात आले आहे.यावेळेस शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र राठोड,उपजिल्हाप्रमुख आबासाहेब काळे,प.स.सदस्या सौ.सवितांताई सोपान गव्हाडे पाटील, बबलु हाजी,गटनेते अक्षय काळे,शहरप्रमुख संतोष बोडखे,नगरसेवक बंटी भाऊ काळे,कदिर शहा,राजु दुतोंडे,भगवान जोहरे,किशोर मामा मापारी,दिपक पगारे,भगवान जोहरे,गजानन कुंडले,समाधान काळे,रमेश गव्हांडे, यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## शिवकर गावात 'ग्रीन रिवाईव्हल पार्क' या महत्त्वपूर्ण पर्यावरणपूरक उपक्रमाचा शुभारंभ आणि हस्तांतरण सोहळा उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर): पन**वेल तालुक्यातील शिवकर गावात 'ग्रीन रिवाईव्हल पार्क' या महत्त्वपूर्ण पर्यावरणपूरक उपक्रमाचा शुभारंभ आणि हस्तांतरण सोहळा उत्साहात पार पडला. ह्युंदाई मोबिस, महाराष्ट्र शासन आणि वर्ल्ड व्हिजन इंडियाच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प राबविण्यात आला आहे.या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे शहरी भागात हरित क्षेत्र वाढवणे, पर्यावरणाचा समतोल राखणे आणि नागरिकांसाठी स्वच्छ व आरोग्यदायी सार्वजनिक जागा निर्माण करणे. वाढते प्रदूषण, कमी होत चाललेली झाडे आणि बदलते हवामान यामुळे अशा प्रकल्पांची गरज अधिक जाणवू लागली आहे. त्यासाठीच १ ते २ एकर जागेवर नैसर्गिक, शाश्वत आणि समृद्ध हरित परिसंस्था उभारण्याचा हा प्रयत्न आहे. रायगडमधील या उद्यानात सुमारे १२,००० देशी झाडे आणि झुडपे लावण्यात आली आहेत. त्यामुळे परिसरातील हरित आच्छादन वाढले असून हवेची गुणवत्ता सुधारण्यास मदत होणार आहे. या पार्कमध्ये फिरण्यासाठी पायवाटा, हिरवे लॉन, तलाव, विश्रांतीसाठी बाक, कचरा व्यवस्थापन सुविधा आणि सौर दिवे यांसारख्या सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, हा संपूर्ण परिसर प्लास्टिकमुक्त घोषित करण्यात आला आहे. या प्रकल्पात स्थानिक



समुदायाचा मोठा सहभाग दिसून आला. १० हून अधिक शाळांतील विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण आणि पर्यावरण जनजागृती उपक्रमात सहभाग घेतला. त्यामुळे तरुणांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण झाली आहे. हा उपक्रम भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत,रायगडचे डेपो हेड सत्यजित भिटे, BDO समीर वाठारकर पनवेल पंचायत समितीच्या उपसभापती भुपेंद्र पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, मोबिस इंडिया लिमिटेड यांच्यासह इतर शासकीय आणि ह्युंदाई मोबिसच्या अधिकाऱ्यांच्या आणि स्थानिक ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत पार पडला. 'ग्रीन रिवाईव्हल पार्क' हा उपक्रम पर्यावरण संवर्धनासोबतच नागरिकांना निसर्गाशी जोडणारा एक महत्त्वाचा प्रयत्न आहे. सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून उभारलेला हा प्रकल्प भविष्यात अधिक हरित, स्वच्छ आणि शाश्वत समाज घडविण्यास हातभार लावणार आहे.

# सिल्लोडच्या शिवारात 'पाचुंदा' वृक्षाचा शोध!

## चिंचवण परिसरात दुर्मिळ प्रजातीची पहिली नोंद; विद्यार्थ्यांनी उभारली संरक्षणाची साखळी

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर सिल्लोड** :-निसर्गाच्या अगाध किमयेचा एक दुर्मिळ आविष्कार सिल्लोड तालुक्यात समोर आला असून, चिंचवण ते आमठाणा जुन्या रस्त्यालगत 'पाचुंदा' (Capparis grandis) या अत्यंत दुर्मिळ वृक्षाची पहिली शास्त्रोक्त नोंद करण्यात आली आहे. अभिनव प्रतिष्ठानचे पर्यावरण अभ्यासक डॉ. संतोष पाटील यांनी वनभ्रमंती दरम्यान या वृक्षाचा शोध लावला. या वृक्षाला कायदेशीर संरक्षण मिळावे यासाठी ग्रामपंचायतीच्या 'लोक जैवविविधता नोंदवही' आणि वनविभागाच्या 'बीट बुक' मध्ये या नोंदीचा समावेश करण्याचे अधिकृत पत्र देऊन प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

**निसर्गाची 'लाइफलाईन' आणि 'ट्री फॉर बी' संकल्पना**

जैवविविधतेच्या साखळीत हा वृक्ष म्हणजे एक 'संजीवनी' आहे. 'ट्री फॉर बी' (Tree for Bee, Butterfly, Bird) या संकल्पनेनुसार, हा वृक्ष मधमाशा, फुलपाखरे आणि पक्ष्यांसाठी अन्नाचा मुख्य स्रोत ठरतो. मार्च महिन्याच्या रणरणत्या उन्हात जेव्हा निसर्गात मकरंदाची (Nectar) कमतरता असते, तेव्हा या झाडाला येणारी सुवासिक पांढरी फुले मधमाशांना जीवनदान देतात. पिकांच्या परागीभवनासाठी (Pollination) मधमाशा अनिवार्य आहेत, त्यामुळे शाश्वत शेतीसाठी पाचुंदासारखे वृक्ष जपणे ही काळाची गरज आहे.

**विद्यार्थ्यांचे 'निसर्ग वाचन' आणि संरक्षणाची साखळी**

येथील ऐतिहासिक व ४०० वर्षांहून अधिक वयोमान असलेल्या विशाल वडाच्या परिसरात ही नवी नोंद पर्यावरणासाठी दिलासादायक ठरली आहे. हे महत्त्व पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी येथे प्रत्यक्ष भेट दिली. जागतिक दर्जाच्या दुर्बिणीतून विद्यार्थ्यांनी या वृक्षावरील जैवविविधतेचे सूक्ष्म निरीक्षण केले. भविष्यात रस्ते रुंदीकरण किंवा मानवी हस्तक्षेपामुळे या दुर्मिळ वारशाला धक्का



लागू नये, यासाठी विद्यार्थी व शिक्षकांनी वृक्षभोवती 'मानवी साखळी' उभारून संरक्षणाचा प्रभावी संदेश दिला.

**महत्वाचे मुद्दे :-**

ऐतिहासिक नोंद: सिल्लोड तालुक्यात 'पाचुंदा' वृक्षाची वन्य अवस्थेतील पहिलीच अधिकृत नोंद.

यजमान वृक्ष (Host Plant): पायोनीयर, क्रीमसन टीपसह ९ प्रजातींच्या फुलपाखरांसाठी हा वृक्ष अत्यंत महत्त्वाचा आहे.

कायदेशीर कवच: ग्रामपंचायत PBR आणि वन विभाग Bit Book मध्ये नोंदीचे पत्र सादर.

की -स्टोन प्रजाती : जैवविविधतेचा समतोल राखणारा अत्यंत महत्त्वाचा वृक्ष.

**"निसर्गाची ही साखळी तुटली तर त्याचा थेट परिणाम मानवी जीवनावर आणि शेतीवर होतो. म्हणूनच पाचुंदासारख्या प्रजातीचे संवर्धन करणे अनिवार्य आहे. या वृक्षाचे बीज संकलन करून नवी रोपवाटिका तयार करण्याचा आमचा निर्धार आहे."**

**— डॉ. संतोष पाटील (पर्यावरण संवर्धक, अभिनव प्रतिष्ठान)**

या उपक्रमात मुख्याध्यापक विनय ज्ञाने, रत्नाकर खेळवणे, वासुदेव मोहने, सोमनाथ घोडके, शिरीन अत्तार आणि अलका लंबे यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. या सर्व उपक्रमशील शिक्षकांना सिल्लोड वनविभाग व अभिनव प्रतिष्ठानतर्फे 'निसर्गस्नेही शिक्षक' म्हणून सन्मानित करण्यात येणार आहे.

## भारतीय बौद्ध महासभेची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी योगेश चौदंते** : दि. २५ मार्च २०२६ रोजी श्रद्धास्थळ भीमघाट येथे भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने एक महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत संघटनेच्या सुरू असलेल्या कार्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला तसेच आगामी काळातील दिशा व धोरणांवर व्यापक चर्चा करण्यात आली.बैठकीत




संघटनेत सक्रियपणे कार्यरत एन. हनुमंते (विष्णुपुरीकर) असलेले बौद्धाचार्य एस. यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेण्यात आली. त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांची नांदेड उत्तर जिल्हा शाखेच्या संरक्षण सचिवपदी निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन व्यक्त करून पुढील धम्म कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.या बैठकीस जिल्हाध्यक्ष गणपत गायकवाड, सरचिटणीस दामोदर सरकटे, कोषाध्यक्ष सुभाष नरवाडे, कार्यालयीन सचिव सा. ना. भालेराव तसेच सुरेश गजभारे, रवीकिरण जोंधळे, कुमारस्वामी माने, कृष्णाजी गजभारे, आप्पाराव येरेकर, आनंदराव झडते, जनार्दन जमदाडे, डी. एन. कांबळे, शंकर गायकवाड आणि सुभाष लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी संघटनेचे बळकटीकरण करण्याबरोबरच धम्म प्रसार अधिक प्रभावी करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याचा ठाम निर्धार व्यक्त करण्यात आला.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# आई-वडिलांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा – ह.भ.प.संजय महाराज घोडके

**दैनिक युवक आधार**

**अंभोरा प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे** : आष्टी तालुक्यातील अंभोरा येथे कै.पांडुरंग लक्ष्मण काळे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रम अत्यंत भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमानिमित्त ह.भ.प. भागवत धर्म प्रसारक संजय महाराज घोडके यांचे प्रभावी व मार्गदर्शक प्रवचन झाले.या प्रसंगी मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून प्रवचनाचा लाभ घेतला. कार्यक्रमाची सुरुवात हरिनामाच्या गजरात व पूजन विधीने झाली. संपूर्ण परिसर "राम कृष्ण हरी" या नामघोषाने दुमदुमून गेला होता.प्रवचनादरम्यान बोलताना संजय महाराज घोडके यांनी सांगितले की, आई-वडील जोपर्यंत जिवंत आहेत, तोपर्यंत त्यांची सेवा करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे आणि तीच खरी ईश्वरसेवा आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात माणूस आपल्या कर्तव्यांपासून दूर जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले की, मानवी आयुष्य हे पाण्याच्या बुडबुड्यासारखे क्षणभंगुर आहे. त्यामुळे या अल्पायुष्यात माणसाने ईश्वरसेवा, सत्कर्म आणि नामस्मरण यामध्येच आयुष्य व्यतीत करावे.महाराजांनी संसारातील सुख-दुःख यांचे उदाहरण देताना सांगितले की, संसारातील सुखे ही मृगजळाप्रमाणे भासमान




असतात. खरे समाधान, शांती आणि आनंद हा केवळ ईश्वरनामातच आहे.तसेच त्यांनी सांगितले की, जीवनामध्ये खरा आनंद मिळवण्याचा एकच मार्ग आहे — अखंड ईश्वरनाम स्मरण. नामस्मरणानेच मन शुद्ध होते आणि आत्मिक समाधान प्राप्त होते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या प्रवचनामुळे उपस्थित भाविकांना जीवन जगण्याचा नवा दृष्टिकोन मिळाला. अनेकांनी या विचारांमधून प्रेरणा घेतली.कार्यक्रमानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम शांततेत व भक्तिमय वातावरणात पार पडला.या कार्यक्रमासाठी गावातील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे परिश्रम घेतले.

# हिंगोली चे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत गौरव

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी -विजय खुडे** : हिंगोली- महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी '१५० दिवस सेवाकर्मी कार्यक्रम' अंतर्गत उत्कृष्ट प्रशासकीय कामगिरी केल्याबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज मुंबई येथे राज्यस्तरीय सन्मान करण्यात आला. हा सन्मान राज्यातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या निवडक जिल्हा परिषदांना प्रदान करण्यात येत असून, हिंगोली जिल्ह्याने यामध्ये उल्लेखनीय स्थान मिळवले आहे.

या १५० दिवसांच्या विशेष मोहिमेत जिल्हा परिषद हिंगोलीने प्रशासनातील पारदर्शकता, गतिमानता व कार्यक्षमतेस प्राधान्य देत विविध सुधारणा राबवल्या. विशेषतः प्रलंबित प्रशासकीय कामे वेळेत पूर्ण करून शासकीय यंत्रणेला अधिक परिणामकारक बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला.



यामध्ये सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या ज्येष्ठता याद्या अद्ययावत करून त्या प्रसिद्ध करण्यात आल्या. पदोन्नती प्रक्रिया वेगाने पूर्ण करून पात्र कर्मचाऱ्यांना न्याय देण्यात आला. तसेच, सरळसेवेतील रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया गतिमान करून प्रशासनातील मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यात आली. बिंदुनामावली अद्ययावत करून तिचे प्रमाणिकरण करण्यात आले, ज्यामुळे आरक्षण व सेवा विषयक बाबींमध्ये पारदर्शकता सुनिश्चित झाली.अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीची प्रक्रिया देखील यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली, ज्यामुळे संबंधित कुटुंबांना तातडीने आधार मिळाला. या सर्व कामांमुळे प्रशासनातील विश्वासार्हता व उत्तरदायित्व वाढले आहे.

तसेच, केंद्र शासनाच्या IGOT कर्मयोगी पोर्टलवर सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची नोंदणी करून त्यांना कौशल्यवृद्धीसाठी विविध प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण करण्यास प्रवृत्त करण्यात आले. प्रत्येक कर्मचाऱ्याने किमान पाच अभ्यासक्रम पूर्ण केले असून, यामुळे त्यांच्या कार्यक्षमतेत व सेवाभिमुखतेत सकारात्मक बदल झाला आहे.यासोबतच, सर्व कर्मचाऱ्यांच्या मूळ व दुय्यम सेवा पुस्तिका अद्ययावत करून त्यांचे संगणकीकरण करण्यावर भर देण्यात आला. यामुळे सेवा नोंदी अधिक अचूक व सुलभ झाल्या असून भविष्यातील प्रशासकीय निर्णयप्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे.जिल्हा परिषद हिंगोलीने प्रभावी नियोजन, विभागांतील सुसूत्रता, समन्वय, वेळेचे काटेकोर पालन व उद्दिष्टपूर्ती यामध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावल्यामुळेच हा मानाचा पुरस्कार मिळाला आहे. हा गौरव केवळ एका अधिकाऱ्याचा नसून संपूर्ण जिल्हा परिषद यंत्रणेच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी नमूद केले.

या यशामागे जिल्हा परिषदेमधील सर्व विभागांचे अधिकारी, कर्मचारी, तसेच विविध स्तरांवरील समन्वय आणि टीमवर्क महत्त्वपूर्ण ठरले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भविष्यातही हीच कार्यपद्धती कायम ठेवून नागरिकांना अधिक दर्जेदार, पारदर्शक, गतिमान आणि परिणामकारक सेवा देण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. या राज्यस्तरीय गौरवामुळे जिल्हा परिषद हिंगोलीच्या कामकाजाला नवी दिशा मिळणार असून, प्रशासनातील उत्कृष्टतेचा हा आदर्श इतर जिल्ह्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# वडखळ-पेण महामार्गाची शापझाळ! नितीन गडकरींसह NHAI चे 'टोल लुटारू' धोरण; जोगांचे उपोषणाने शासनाच्या नाकात नाक खुपसले जाईल!

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : राष्ट्रीय महामार्गावरील वडखळ फ्लायओवरची दुर्दशा आणि एकतर्फी सर्व्हिस रोडमुळे वाहनचालकांना जीव मृत्यूच्या खेळात अडकवले जात असताना, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, N.H.A.I. प्रकल्प अधिकारी पनवेल, रायगड जिल्हाधिकारी अलिबाग यांचे 'उदासीन नाकर्तेपण' जनतेच्या संतापाची लाट उसळवत आहे! सामाजिक कार्यकर्ते दिलीप अनंत जोग यांच्या सततच्या तक्रारी-आंदोलनांना कानाडोळा करून आता टोलवसुलीच्या तयारीत असलेले हे अधिकारी J.N.P.A. जंक्शन रोडवरील कार्यालयासमोर पुढील महिन्यात होणाऱ्या एकदिवसीय उपोषणाने चांगलेच 'कान टोचले' जाणार आहेत! NHAI ची जबाबदारी टाळाटाळ: ट्रॅफिक जॅममधून अपघातांची भरमार, तरी टोल लुटारू धोरणाची तयारी!अलिबाग-पेण



मार्गावरील वडखळ फ्लायओवरखालील दोन्ही सर्व्हिस रोड खराब होऊन धूळिमाण उडवत असून, डावीकडे वळण्यासाठी केवळ एकच रोड उपलब्ध!

दुसरा रोड 'झोपेत' पडलेला असल्याने वर्षानुवर्षे ट्रॅफिक जॅम, किरकोळ अपघात आणि प्रवाशांचा जीव धोक्यात! जोग यांनी सांगितले, "N.H.A.I. 'हा NH रस्ता झाल्याने जबाबदारी नाही' अशी बहाणा करून S.D.O. पेणकडे बोटे दाखवते. फ्लायओवरची चुकीची अलाइनमेंट मान्य करतात, पण दुरुस्ती शून्य! अलिबाग-मुरूड-वडखळ-पेण-रेल्वेपूल दिशादर्शक फलकही अपुरे. गेल्या वर्षांत तक्रारी केल्या, आंदोलने केली,

पण गडकरींनीही दखल घेतली नाही!"शासनाच्या 'टोल लुटारू' धोरणाला उघड उघड चपराक! रस्ते खराब, तरी टोलवसुलीची लगबग! रस्ते सुधारले नसतानाही टोलवसुलीची तयारी करणाऱ्या या यंत्रणेच्या वेळखाऊ वृत्तीमुळे स्थानिक व्यापारी, शेतकरी, विद्यार्थी यांचा रोजचा खटाटोप वाढला आहे. "लोकांच्या त्रासाची जाणीव नसल्यासारखे वागताय! उपोषणाने तुमच्या नाकात नाक खुपसू!" असे जोग यांनी शासनाला इशारा दिला. जनतेतून प्रतिक्रिया उसळतेय: "रस्ता नाही, तरी टोल? ही लुटारू धोरणे बंद करा!"

**"जोगांच्या धारदार मागण्या"** –

१)तात्काळ कारवाई व्हावी!

फ्लायओवरखालील दोन्ही सर्व्हिस रोड १५ दिवसांत दुरुस्त!

२)दुसरा सर्व्हिस रोड प्रत्यक्ष वापरात आणा, ट्रॅफिक जॅम संपवा!

३)दिशादर्शक फलक सुधारून सुरक्षित वाहतूक सुनिश्चित करा!

या मुद्द्यांवर लेखी उत्तर न दिल्यास आंदोलन तीव्र होईल, असे जोग यांनी हाक दिली. शासनाच्या डोळे उघडणाऱ्या या प्रकरणाकडे जनतेचे लक्ष लागले आहे – टोलपूर्वी रस्ते सुधारणार का!

# पहेला ते निमगाव रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा – जिल्हा प्रशासनाचे रस्त्याकडे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/भंडारा** - तालुक्यातील पहेला ते निमगाव कडे जाणाऱ्या 2 मीटर रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था असून खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा अशी परिस्थिती या रस्त्याची झालेली आहे. मागील पाच वर्षापासून या रस्त्यांची गिट्टी उघडलेली असून या रस्त्याने साधी सायकल चालवणे सुद्धा अवघड आहे. रात्रीला डिलिव्हरीची पेशंट सुद्धा आणणे अवघड काम आहे. या रस्त्याबाबत अनेकदा प्रशासनाला निवेदन देण्यात आले. परंतु ते केराच्या टोपलीत टाकण्यात आलेले आहे. निमगाव हे गाव गोसे खुर्द बॅकवॉटरमुळे तिन्ही बाजूने वेडले असते .फक्त रस्ता तिथे बाकी असतो .तेथील लोकांची पुनर्वसनाकरिता




शासनाकडे मागणी केली. परंतु शासन त्यांच्या मागणीला सुद्धा केराची टोपली दाखवीत आहे .या रस्त्याबाबत सामाजिक कार्यकर्ते कुलदीप गंधे यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी सांगितले की गावात जनावरे राहतात की लोक राहतात हेच कळत नाही. रात्री बे रात्री पेशंट या रस्त्याने दवाखान्यात आणायचा असला तर रस्ता बरोबर दिसत नाही केव्हाही दगावू शकतो याला जबाबदार कोण राहणार असा प्रश्न त्यांनी निर्माण केला.. युवा कार्यकर्ता शेखर कोठारे यांनी सांगितले की स्वातंत्र्याच्या 75 वर्षात वर्षांनंतर सुद्धा नागरिकांना जायला साधा रस्ता नसेल तर हे कुठले स्वातंत्र्य असा प्रश्न उपस्थित केला. त्याचप्रमाणे यांनी सांगितले की मी निमगावहून रोज येणं जाणं करतो पण माझी सायकल सुद्धा चालवायला साधा रस्ता नाही अशी परिस्थिती रस्त्याची आहे. यावेळी खुशाल गाढवे, जिनेस्वर धुळसे, चंदुलाल मोटघरे ,शिवदास भोयर व गावकरी उपस्थित होते.

# कळंबोलीत आधुनिक शैक्षणिक संकुल उभारा ; नगरसेवक रामदास शेवाळे यांची महापौरांकडे मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** कळंबोली सेक्टर-२०, भूखंड क्र. १८ येथील राखीव जागेवर अत्याधुनिक शैक्षणिक संकुल उभारण्याबाबत कळंबोलीचे नगरसेवक रामदास शेवाळे यांनी पनवेलचे महापौर नितीन पाटील यांच्यादके मागणीचे निवेदन सादर केले.या निवेदनामध्ये शेवाळे यांनी या परिसरातील वाढती लोकसंख्या आणि अपुऱ्या शैक्षणिक सुविधांमुळे विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींचा उल्लेख केला




आहे. त्यामुळे येथील राखीव भूखंडाचा योग्य वापर करून आधुनिक सुविधा असलेले शैक्षणिक संकुल उभारणे गरजेचे असल्याचे शेवाळे यांनी या निवेदनात नमूद केले आहे. या संकुलामध्ये डिजिटल क्लासरूम, सुसज्ज ग्रंथालय, क्रीडा सुविधा तसेच इतर आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली आहे.यावेळी पनवेल महानगरपालिकेचे सभापती बबन मुकादम, सहकारी महेश गोडसे तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# सिल्लोड पंचायत समितीच्या मासिक बैठकीत घरकुल, विहिरींच्या प्रश्नांवरून खडाजंगी

## सदस्या वृषाली मिरकर यांचा आक्रमक पवित्रा; प्रशासकीय यंत्रणेला धरले धारेवर

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर सिल्लोड** :- सिल्लोड येथील पंचायत समितीची तब्बल चार वर्षांच्या प्रदीर्घ खंडानंतर पार पडलेली पहिलीच मासिक बैठक विविध जनहिताच्या प्रश्नांवरून वादळी ठरली. सदस्या वृषाली सुनील मिरकर यांनी शुक्रवारी (दि. २७) झालेल्या बैठकीत अत्यंत आक्रमक पवित्रा घेत घरकुल, सिंचन विहिरी आणि आगामी संभाव्य पाणीटंचाईच्या मुद्द्यावरून प्रशासकीय यंत्रणेला धारेवर धरले. सभेच्या सुरुवातीलाच त्यांनी घरकुल योजनेच्या प्रलंबित देयकांचा प्रश्न उपस्थित करून लाभार्थ्यांची होत असलेली ओढाताण थांबवण्याची सूचना केली.बैठकीत बोलताना मिरकर यांनी सन २०२४-२५ मधील सिंचन विहिरींच्या मंजुरी प्रक्रियेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. विहिरी मंजूर केल्यानंतर त्या पुन्हा तांत्रिक कारणास्तव रद्द झाल्यामुळे पात्र लाभार्थ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे, ही बाब त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. यापुढे नवीन विहिरी मंजूर करताना ज्या लाभार्थ्यांच्या विहिरी पूर्वी रद्द झाल्या होत्या, त्यांनाच प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली. तसेच रोजगार हमी योजनेतील विविध कामांची देयके प्रशासनाने तत्काळ अदा करावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेचे काम पूर्ण झालेल्या गावांत प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू होण्यास विलंब लागण्याची शक्यता लक्षात घेऊन, आगामी उन्हाळ्यातील टंचाई निवारण्यासाठी 'रोहयो'तून नवीन विहिरी मंजूर करण्याची मागणी



त्यांनी केली.ग्रामीण भागातून मागणी येताच विहीर अधिग्रहण आणि टँकरची सुविधा विनाविलंब उपलब्ध करून देण्याबाबत त्यांनी प्रशासनाला सतर्क केले. प्रशासकीय पारदर्शकतेसाठी प्रत्येक अधिकाऱ्याच्या दालनाबाहेर त्यांच्या जबाबदाऱ्यांचे नियुक्ती फलक लावण्याची मागणीही त्यांनी यावेळी लावून धरली. या बैठकीतील वृषाली मिरकर यांच्या अभ्यासपूर्ण भूमिकेमुळे प्रशासकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली असून, आता संबंधित विभाग या मागण्यांची दखल कशी घेतो, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.शासनाचे मोफत वाळूचे धोरण असूनही ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांना चढ्या दराने वाळू विकत घ्यावी लागत आहे. हा वाढीव आर्थिक भार कमी करण्यासाठी तहसील प्रशासनाने जप्त केलेला अवैध वाळूसाठा या गरजू लाभार्थ्यांना नियमानुसार तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी वृषाली मिरकर यांनी या बैठकीत लावून धरली.

# देव मानसातच भेटतो: डॉ.विजय मुन यांची प्रेरणादायी कथा

मानवतेचा खरा अर्थ काय असतो, हे काही व्यक्ती आपल्या कृतीतून जगाला दाखवून देतात. पैशापेक्षा माणूस मोठा, परिस्थितीपेक्षा संवेदना मोठी आणि व्यवसायापेक्षा कर्तव्य मोठं* — याचं जिवंत उदाहरण म्हणजे डॉ. विजय मुन. यवतमाळ

वंचित, उपेक्षित, समाजाच्या कडेला ढकललेल्या *पारधी समाजातील* एक कुटुंब… हातात काहीच नाही, पण मनात माणुसकीचा महासागर. पुण्याच्या रस्त्यांवर, मंदिरासमोर उभं राहून " *पपीता माळवे चालवित असलेल्या आम्ही साऱ्या सावित्रीच्या लेकी* " या शैक्षणिक आश्रयासाठी *एक एक रुपया गोळा करणारा हा संघर्ष… आणि त्याच कुटुंबातील वयस्क श्री. लक्ष्मण माळवे "मृत्यूशी झुंज" देत होते*.

एकीकडे गरिबी, दुसरीकडे आजार… आणि तिसरीकडे असहाय्यतेचं ओझं. पुण्यात उपचार झाले, पण प्रकृती खालावत गेली. यवतमाळला नेलं, सरकारी दवाखान्यात भरती केलं, पण *आशेचा किरण दिसेना*. शेवटी नागपूरला रेफर……. त्या क्षणी सुन पपीता माळवे यांच्या *डोळ्यातून वाहणारे अश्रू* हे फक्त पाण्याचे थेंब नव्हते — ते असहाय्यतेचं, भीतीचं आणि "आता काय?" या प्रश्नाचं ओझं होतं.

*माझा बाप मरतो आहे*…" — या एका वाक्यात एक संपूर्ण आयुष्य कोसळत होतं.

आणि मग… त्या अंधारात एक प्रकाश आला.

शेवटचा प्रयत्न म्हणून 25 मार्चला त्यांना *साई श्रद्धा हॉस्पिटल* यवतमाळ येथे

नेण्यात आलं. तिथे भेटले — *डॉ. विजय मुन*.

त्या क्षणी डॉक्टर नव्हते, ते एक आधार होते… एक विश्वास होते… एक हात होता जो म्हणत होता —

" *मी आहे ना*…"

हे तीन शब्द साधे होते, पण त्या कुटुंबासाठी ते *देवाचा आवाज होते*.

डॉ. मुन यांनी पेशंटकडे फक्त एक 'केस' म्हणून पाहिलं नाही, तर *एक माणूस म्हणून पाहिलं. त्यांनी त्याच्या मागचं आयुष्य पाहिलं* — त्याचा संघर्ष, त्याची माणुसकी, त्याचं समाजासाठीचं योगदान.

उपचार सुरू झाले… आणि *तिसऱ्याच दिवशी जणू चमत्कार झाला*.

जो माणूस *मृत्यूच्या उंबरठ्यावर होता*, *तो उठून बसला*. चेहऱ्यावर समाधान, डोळ्यांत कृतज्ञता, आणि त्या क्षणी शब्दांची गरजच उरली नाही. त्या पेशंटचा चेहरा बोलत होता — " *मी वाचलो*…"

त्या क्षणी डॉ. मुन यांचं कौतुक *शब्दांत मांडणं अशक्य होतं*. कारण त्यांनी फक्त उपचार केले नव्हते — त्यांनी एक कुटुंब वाचवलं होतं, एक आशा जिवंत ठेवली होती.

सगळ्यात मोठी गोष्ट म्हणजे — *पैशाचा विषयच आला नाही.*

" *इतके पैसे जमा करा, तितके करा…*" — असं काहीच नाही.

उलट त्यांनी सांगितलं —

" *तुम्ही पारधी समाजाच्या मुलींसाठी




लढत आहात, हीच माझ्यासाठी मोठी गोष्ट आहे*. मला तुमच्यावर उपचार करण्याची संधी मिळाली — हेच माझं भाग्य आहे. *मी माझं कर्तव्य पार पाडतोय… मी आहे ना.*"

आजच्या काळात, जिथे आरोग्यसेवा अनेकदा व्यवहार बनते, तिथे डॉ. विजय मुन यांनी ती पुन्हा एकदा "सेवा" बनवली.

*त्यांच्या या कृतीतून जाणवतं — देव मंदिरात नसतो, तो अशा माणसांच्या रूपात आपल्या आजूबाजूला वावरत असतो*.

पपीता माळवे यांच्या डोळ्यांतील अश्रू आजही आहेत… पण आता ते दुःखाचे नाहीत — ते *कृतज्ञतेचे* आहेत.

कारण कुणीतरी त्यांच्या आयुष्यात येऊन खरंच सांगितलं —

" *मी आहे ना*…"

आणि त्या तीन शब्दांनी एक जीव, एक कुटुंब, आणि एक विश्वास वाचवला.

**नरेंद्र शा पवार**
**रमेश केळकर**

# रायगड विभागाच्या पथकाकडून पाटोदा बसस्थानकाची तपासणी

## चुंबळी फाटा मार्गे जाणाऱ्या बसेस पाटोद्यातुन जाव्यात व नवीन बस देण्यात याव्यात पत्रकार संघानी केली मागणी

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी):-** 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक' अभियानांतर्गत चौथ्या टप्प्यातील सर्वेक्षण पाटोदा येथे पार पडले. रायगड विभागाचे विभागीय नियंत्रक डॉ.सुहास चौरे यांच्या नेतृत्वाखालील विशेष पथकाने बसस्थानकातील सर्व व्यवस्थांची सखोल पाहणी केली. या सर्वेक्षणात बसस्थानकाचे नियोजन, प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सुविधा, स्वच्छतागृहांची स्थिती, वृक्षारोपण आणि परिसरातील स्वच्छता अशा विविध निकषांची तपासणी करण्यात आली. या पथकामध्ये रायगड विभागाचे डी.वाय. एम.ए.संजय चव्हाण, एक पत्रकार व एक प्रवासी प्रतिनिधीचा समावेश होता. हिंदू हृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे बसस्थानक स्वच्छता अभियानांतर्गत सर्वेक्षणासाठी पाटोदा आगारात रायगड विभागाचे विभागीय नियंत्रक डॉ.सुहास चौरे, सहाय्यक यंत्र अभियंता यांनी २५ मार्च रोजी भेट देऊन सविस्तर पाहणी केली. राज्य परिवहनच्या नियमांनुसार निश्चित निकषांच्या आधारे स्वच्छतेची पाहणी करण्यात आली. तपासणी अधिकाऱ्यांनी एकूण व्यवस्थेबाबत समाधान व्यक्त केले. सदर पाहणी दरम्यान स्थानिक पातळीवरील गुणांकनाची जबाबदारी पाटोदा तालुका



पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे यांनी पार पडली. या वेळी त्यांचे समवेत पाटोदा आगाराचे आगार प्रमुख संतोष डोके व सहाय्यक आगार प्रमुख विकास खेडकर उपस्थित होते. या वेळी सोमीनाथ कोल्हे यांनी पाटोदा येथील प्रवाशांच्या विविध समस्या अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. बीडहून मुंबईकडे जाणाऱ्या येणाऱ्या बसगाड्या चुंबळी फाट्यावरून जात असल्याने त्या पाटोदा मार्गे जाव्यात, पाटोदा तालुक्याचे ठिकाण असुन येथे डेपो असुन सुद्धा या बसेस पाटोद्यात न येता बाहेरुन जातात तर दुसरीकडे तालुक्याचे ठिकाण नसताना तेथे डेपो नसताना तसेच तेथे एक ही प्रवासी या गाड्यांनी प्रवास करत नसताना सर्व बसेस त्या मार्गाने का सोडल्या जातात आणि या अगोदर पाटोदा मार्गे जाणाऱ्या व येणाऱ्या बस बंद करून चुंबळी फाटा मार्गेच का जातात त्या सर्व बसेस पाटोदा मार्गे जाव्यात अशी मागणी केली. तसेच पाटोदा आगारातील जवळपास सर्वच बस कालबाह्य म्हणजे १५ पेक्षा जास्त वर्षांच्या झालेल्या आहेत, त्या मुळे चालक, वाहक व प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. त्या मुळे नवीन बस मिळाव्यात, काही बाहेरील डेपोच्या बस रात्रीच्या वेळी छत्रपती शिवाजी महाराज चौकातून थेट पुढे जात असुन त्या बस बसस्थानकात येत नसल्याने प्रवाशांना चौकात उतरावे लागते. महिला प्रवाशांना या मुळे अडचणी निर्माण होत असल्याची ही गंभीर बाब अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. या वेळी पत्रकार अजिज शेख, पत्रकार सय्यद रियाज, पत्रकार महेशर शेख, पत्रकार सचिन गायकवाड तर प्रवासी प्रतिनिधी म्हणून दत्ता देशमाने यांची उपस्थिती होती.

### कळंबोली मध्ये अमली पदार्थाचे सेवन व विक्री होत असल्याबद्दल कारवाई करण्याबाबत नगरसेविका बायजा बारगजे यांचे कळंबोली पोलिसांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** कळंबोली मध्ये अमली पदार्थाचे सेवन व विक्री होत असल्याबद्दल प्रभाग आठ च्या नगरसेविका सौ बायजा बबन बारगजे यांच्या वतीने कळंबोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांना निवेदन देण्यात आले. यावेळी बबन बारगजे, माणिकराव पवार, बाळासाहेब जगताप, महेंद्र खबाले, वैभव फाळके, कृष्णा गर्जे, दिलीप गर्जे ,सचिन मुळीक उपस्थित होते . यावेळी शिष्टमंडळात भेट दिल्यानंतर राजेंद्र कोते यांनी सांगितले की आमची ही कारवाई चालूच आहे व नागरिकांनी सुद्धा यामध्ये संशयित व्यक्तींची नावे व ठिकाण आमच्या पोलीस प्रशासनास कळवावेत आम्ही योग्य ती कारवाई करू असे आश्वासन दिले. .

### कारचालकाने पोलीस चौकीचे केले नुकसान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** पोलिसांना धक्काबुक्की करून चौकीच्या आवारातील कुंड्या, प्लास्टिकच्या खुर्चा तसेच चौकीचा काचेचा दरवाजा तोडून नुकसान केल्याप्रकरणी कारचालक शेरबहादूर याच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संजय जाधव हे पनवेल वाहतूक शाखेत पोलीस हवालदार असून, ते गस्त करत असताना एका कारला त्यांनी हात दाखवून थांबण्याचा इशारा केला. मात्र चालकाने कार जाधव यांच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पोलिसांनी त्याला कोनगाव येथील चौकीच्या आवारात आणले असता त्याने चौकीसमोरील झाडांच्या कुंड्या, प्लास्टिकच्या खुर्च्या तसेच चौकीचा काचेचा दरवाजा तोडून नुकसान केले. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### चार लाख ६२ हजार रुपयांच्या लोखंडी सळ्यांचा केला अपहार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर): चार** लाख ६२ हजार रुपये किमतीच्या ७ हजार किलो वजनाच्या लोखंडी सळ्यांचा अपहार केल्याप्रकरणी चालक प्रवीण कुमार याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.किरण ढवळे हे ट्रान्सपोर्ट कंपनीमध्ये मॅनेजर म्हणून नोकरी करतात. ८ मार्च ते ९ मार्च दरम्यान ट्रक ट्रेलरमध्ये ३१ लाख ४ हजार रुपये किमतीच्या लोखंडी सळ्या भरून चालक प्रवीण कुमार हा गोदरेज हिल, कल्याण येथे खाली करण्यासाठी निघाला. हा ट्रक ट्रेलर हा प्रवीण कुमार याने पनवेल येथील गॅरेज शिरढोण येथील कंपाऊंडमध्ये उभा केला आणि दोन ते तीन दिवस येणार नाही असे सांगितले. त्यानंतर चालकाला फोन केला असता प्रत्येक वेळी त्याने खोटे कारण सांगितले आणि फोन स्विच ऑफ येऊ लागला. त्यानंतर कल्याण येथील ज्या ठिकाणी माल द्यायचा होता त्या ठिकाणच्या मालकाने फोन करून माल पाठवा असे सांगितले. यावेळी हा ट्रक मालासह दुसऱ्या चालकाने त्या ठिकाणी जाऊन वजन केले असता ट्रकमधील वजन ७ हजार किलो कमी असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

### विवाहितेचा छळ; सासरच्या मंडळींवर गुन्हा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल दवार्ताहर):** शारीरिक, मानसिक आणि आर्थिक छळ करून क्रूर वागणूक दिल्याप्रकरणी विवाहितेने तिचा पती, सासू-सासरे आणि पतीची मैत्रीण यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार पोलिसांनी या चौघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.४१ वर्षीय पीडित महिला तळोजा येथे राहत असून, त्यांना दोन मुले आहेत. २००९ मध्ये त्यांचे लग्न उत्तर प्रदेश येथे झाले. त्यानंतर माहेरहून काही हुंडा आणला नाही, असे बोलून तुझ्या आई-वडिलांकडून पैसे घेऊन ये अन्यथा तुमचा घटस्फोट करेन, अशी धमकी दिली. मात्र, पीडितेने माहेरून काही आणले नाही म्हणून सासू-सासरे तिला शिवीगाळ आणि मारहाण करून छळ करू लागले. तर तिच्या पतीच्या मैत्रिणीने त्याला भडकवून पीडितेला मारहाण करायला लावायची. त्याच्या या जाचाला कंटाळून या विवाहितेने या प्रकरणी तळोजा पोलिसांत तक्रार दिली आहे.

# महागाव नगरपंचायतीत 'विकासपर्व' सुरू

## सौ. रंजना दीपक आडे यांच्या पहिल्याच महिन्यात ७ कोटींच्या कामांचा धडाका

**दैनिक युवक आधार**

**एमडी सुरोशे/महागाव (यवतमाळ)** : महागाव नगरपंचायतीच्या अध्यक्षपदी विराजमान झाल्यापासून अवघ्या एका महिन्यात सौ. रंजना दीपक आडे यांनी आपल्या कार्यक्षमतेची चुणूक दाखवत शहराच्या विकासाची नवी दिशा स्पष्ट केली आहे. "सत्ता ही केवळ सेवेचे साधन आहे" हे ब्रीद सार्थ ठरवत, कोणत्याही द्वेषाचे राजकारण न करता सर्व नगरसेवक आणि नागरिकांना सोबत घेऊन त्या शहराच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटत आहेत

निधीचा पाऊस ७ कोटींहून अधिक विकासकामे मंजूर

अध्यक्षांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे महागाव शहरासाठी विविध योजनांतर्गत मोठा निधी प्राप्त झाला आहे. यामध्ये अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना दलित वस्ती व मागासवर्गीय भागांच्या कायापालटासाठी २ कोटी ७० लाख रुपयांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.

स्वच्छ भारत अभियान घनकचरा व्यवस्थापन शहराच्या स्वच्छतेसाठी १ कोटी २६ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून, यामुळे कचऱ्याचा प्रश्न कायमस्वरूपी मिटण्यास मदत होणार आहे.

पायाभूत सुविधा व जलशुद्धीकरण डम्पिंग यार्डकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण व वॉल कंपाउंड बांधणे, तसेच प्रभाग क्रमांक १० मधील जलशुद्धीकरण केंद्राला संरक्षक भिंत उभारणे अशा विविध लोकोपयोगी कामांसाठी सुमारे ७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



स्वच्छता आणि नियोजनावर विशेष भर

पदभार स्वीकारताच सौ. रंजना आडे यांनी शहराच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य दिले. शहरातील प्रभाग १ ते १७ मधील साचलेला कचरा नियोजनबद्ध पद्धतीने साफ करून शहराबाहेर हलवण्यात आला आहे. सध्या सर्व प्रभागांत नाल्यांची स्वच्छता मोहीम युद्धपातळीवर सुरू असून, 'स्वच्छ व सुंदर महागाव' करण्याचा त्यांचा संकल्प आहे.

घरकुल लाभार्थ्यांना मोठा दिलासा

गरीब कुटुंबांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी विशेष पाऊले उचलली आहेत. प्रलंबित लाभार्थ्यांच्या खात्यात तातडीने निधी जमा करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या असून, एकही गरजू वंचित राहू नये यासाठी 'वाढीव घरकुल' मंजुरीचा नवीन प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे.

प्रशासकीय इमारतीसाठी पाठपुरावा

नगरपंचायतीची स्वतःची स्वतंत्र आणि सुसज्ज इमारत असावी, यासाठी त्यांनी शासन दरबारी जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत.

नेतृत्वाचे मानले आभार

अध्यक्षांची प्रतिक्रिया

या सर्व विकासकामांबाबत बोलताना नगराध्यक्षा सौ. रंजना दीपक आडे यांनी स्पष्ट केले की, महागाव शहरासाठी मंजूर झालेला हा सर्व निधी नितीनभाऊ भुतडा आणि आमदार किसनराव वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांच्याच अथक प्रयत्नांतून उपलब्ध झाला आहे. त्यांच्या खंबीर पाठबळामुळेच शहराचा विकास आराखडा प्रत्यक्षात उतरत आहे. महागाव स्वच्छ, सुंदर आणि प्रगत करणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे.अल्पावधीतच विकासाचा डोंगर उभा करणाऱ्या सौ. रंजना आडे यांच्या कार्यतत्परतेचे शहरात कौतुक होत असून, महागाव आता प्रगतीच्या नव्या वाटेवर वेगाने धावू लागले आहे.

# थकीत वीजबिलाचा 'शॉक'; सिल्लोडचा पाणीपुरवठा ठप्प!

## कर भरण्याचे मुख्याधिकाऱ्यांचे आवाहन; वसुलीसाठी प्रभागनिहाय पथके तैनात

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर सिल्लोड:-**सिल्लोड नगर परिषदेकडे वीज वितरण कंपनीची मोठी थकबाकी असल्याने महावितरणने खेळणा प्रकल्प येथील पंप हाऊस व जलशुद्धीकरण केंद्राचा वीजपुरवठा खंडित केला आहे. या कारवाईमुळे शहराचा पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला असून, नागरिकांनी तातडीने थकीत घरपट्टी व नळपट्टी भरून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी कारभारी दिवेकर यांनी केले आहे.

सध्या आर्थिक वर्ष २०२५-२६ चा शेवटचा टप्पा असल्याने नगर परिषदेला वीज देयके भरणे कायदेशीररीत्या बंधनकारक आहे. कर वसुली प्रभावीपणे करण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांनी प्रभागनिहाय अधिकारी व कर्मचाऱ्यांची विशेष वसुली पथके नियुक्त केली आहेत. ही पथके आता थेट मालमत्ताधारकांच्या दारी पोहोचणार आहेत.

जोपर्यंत वीज देयकांचा भरणा होत नाही, तोपर्यंत पाणीपुरवठा यंत्रणा कार्यान्वित करणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नाही. त्यामुळे ज्या नागरिकांकडे मालमत्ता कराची थकबाकी आहे, त्यांनी ती तातडीने नगर परिषद कार्यालयात किंवा अधिकृत वसुली पथकाकडे जमा करून संगणकीय पावती घ्यावी. सर्वांनी कराचा भरणा केल्यास तात्काळ वीज बिल भरून पाणीपुरवठा सुरळीत केला जाईल, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.




**मोरेगाव येथे मोरेश्वरी यात्रेनिमित्त चैत्र पौर्णिमेच्या हनुमान जयंतीच्या दिवशी सात दिवसाच्या सप्ताहाची सांगता होणार असून या सोहळ्यासाठी सात दिवसाचे कीर्तन सोहळे व गावकऱ्यातर्फे जेवणाच्या पंगतीचा कार्यक्रम होणार असून हनुमान जयंतीच्या दिवशी गावकऱ्यांच्या वतीने पंचक्रोशीतील सर्व गावकऱ्यांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे व दुसऱ्या दिवशी अखंड हरिनाम सप्ताह हनुमान जयंतीच्या दिवशी सांगता हो भव्य दिव्य असा कुस्त्यांची दंगल होणार आहे यासाठी मराठवाड्यातील नामवंत मल्ल या ठिकाणी कुस्ती स्पर्धेसाठी येत असतात हा सोहळा सर्व मोरेगाव अशी सादर करीत आहेत व यासाठी सकाळी काकड आरती सात ते दहा ज्ञानेश्वरी पारायण एक ते पाच श्रीमद् भागवत कथा होत आहे हा अखंड सोहळ दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मोरेश्वरी देवी च्या यात्रेनिमित्त साजरा होत आहे यासाठी सर्व गावातील तरुण वृद्ध महिला मंडळ हे मेहनत घेत असून हा सोहळा हनुमान जयंतीच्या दिवशी संपन्न होणार आहे हनुमान जयंतीच्या दिवशी गावकऱ्यांतर्फे महापंक्तीचे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे (दैनिक युवक आधार)**

# २२ वी राष्ट्रीय जम्प-रोप स्पर्धा मध्ये महाराष्ट्र, मध्य प्रदेश, हरयाणा, उत्तर प्रदेशच्या खेळाडूंचे वर्चस्व

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी /विलास गायकवाड** : नाशिक जिल्हा जम्प-रोप असोसिएशन, महाराष्ट्र जम्प-रोप असोसिएशन यांच्या वतीने आणि डी. एस.एफ., नाशिक यांच्या सहकार्याने नाशिकमध्ये आयोजित २२ व्या राष्ट्रीय जम्प-रोप स्पर्धेच्या आजच्या दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सुंदर खेळाचे प्रदर्शन करून या स्पर्धेवर आपली छाप सोडली. महाराष्ट्राबरोबर, मध्य प्रदेश, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश या राज्यांच्या खेळाडूंनी सुंदर खेळ करत पदकांची कमाई केली.

मुलीच्या गटात महाराष्ट्राकडून खेळतांना वैभवी यशदा वाडेकर, अनन्या शिंदे, भूमिका नेमाडे, तन्वी नेमाडे, कैवल्या खंडारे, पद्माक्षी मोकळ या खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारात उत्तम कामगिरी करत पदकांची कमाई केली.



या खालोखाल हरियाणाच्या दिशा, इशिता,उर्जिता गोयल, यांनाही सुंदर खेळ करत पदके मिळविली. मध्य प्रदेशाच्या वैभवी शर्मा हीनेही चांगला खेळ करत पदके मिळवली तर उत्तर प्रदेशच्या प्रिया पाठक हिनेही सुंदर खेळ करत दुहेरी पदकाची कमाई केले. पथक, .

मुलांच्या गटात मध्य प्रदेशच्या परम श्रीवास्थव, तरुण लोथ, यांनी दोन प्रकारात सुंदर खेळ करत पदके प्राप्त केली. दिल्लीच्या यश सिंग याने दोन वेग्वेगळ्या प्रकारात सातत्य राखत पदके मिळविली.

आज झालेल्या काही गटांच्या स्पर्धामध्ये विजेत्या पहिल्या तीन खेळाडूंनी प्रमुख पाहुणे नाशिकच्या जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, क्रीडा अधिकारी अरविंद चौधरी, छत्रपती पुरस्कार प्राप्त क्रीडा संघटक अशोक दुधारे, जिल्हा जम्परोप असोसिएशनचे अध्यक्ष दत्ता पाटील, जिल्हा सचिव राजू शिंदे, महाराष्ट्र जम्प-रोप असोसिएशनचे सचिव दीपक निकम यांच्या हस्ते मेडल प्रदान करून गौरवण्यात आले.

उद्या या स्पर्धाच शेवटचा दिवस असून उद्या विविध गटांचे सामने तसेच सांघिक स्पर्धा पार पडतील. या विविध प्रकारांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंनी मिळवलेल्या पादकांची- - गुणानुक्रमे बेरीज करून या स्पर्धेतील सर्वसाधारण विजेता संघ ठरवण्यात येईल अशी माहिती आयोजकांनी दिली.

माझ्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या या स्पर्धेला संपूर्ण भारतातून चांगला प्रतिसाद मिळाला याचे मला समाधान आहे अश्या भावना जेष्ठ क्रीडा संघटक चंद्रशेखर सिंग यांच्यासाठी यांनी व्यक्त केल्या.

या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी राजू शिंदे, प्रशांत परगांवकर, विक्रम दुधारे, दीपक निकम, तन्मय कर्णिक, अविनाश वाघ, आनंद चकोर, ज्योती निकम यांच्यासह नाशिक जिल्हा आणि राज्याचे संघटक, कार्यकर्ते परिश्रम घेतले

# छोटे पक्ष, गट, संघटनांनी रिपब्लिकन पक्षात सामील व्हावे : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे आवाहन

## पीपल्स रिपब्लिकन पक्ष मिलिंद सुर्वे ,राष्ट्रवादी चे नेते जीवन जाधव यांचा रिपब्लिकन पक्षात प्रवेश

**दैनिक युवक आधार**

**मुंबई /प्रतिनिधी :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना प्रमाण मानून काम करणाऱ्या छोट्या पक्षांनी ; विविध रिपब्लिकन गट, विविध संघटनांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया मध्ये झाले पाहिजे.महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष साकार करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. संपूर्ण देशात रिपब्लिकन पक्ष आपण पोहचवला असून लवकरच रिपब्लिकन पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळणार आहे; त्या दृष्टीने रिपब्लिकन पक्षाची घोडदौड सुरू आहे. रिपब्लिकन पक्षाला अधिक बळकट करण्यासाठी छोट्या रिपब्लिकन गटांनी, पक्षांनी आणि संघटनांनी रिपब्लिकन पक्षात सामील व्हावे असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले.

आंबेडकरी चळवळीतील विविध विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी रिपब्लिकन पक्षात सामील झाले पाहिजे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संकल्पना असणारा रिपब्लिकन पक्ष अधिक बलशाली करण्यासाठी आंबेडकरी चळवळीतील विचारवंतांनीही रिपब्लिकन पक्षाचा निळा झेंडा हाती घेतला पाहिजे. रिपब्लिकन पक्षात सामील होऊन रिपब्लिकन पक्ष अधिक बळकट केला पाहिजे असे आवाहन ना. रामदास आठवले यांनी शुक्रवारी केले.

मुंबई मराठी पत्रकार संघात शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पीपल्स रिपब्लिकन पक्ष महाराष्ट्र चे अध्यक्ष मिलिंद सुर्वे;मुंबई अध्यक्ष मंगेश पगारे; राज्य महासचिव डॉ उमेश पवार; राज्य उपाध्यक्ष अशोक तांबे; शशिकांत शिंदे; मोहन बोदडे; नरसिम मुच्छा कट्टा; भीमसेन जाधव; रोहिदास वाघमारे; अनिल लागाडे ; गोविंद साळवी; विक्रम बमना; विजय पंडागळे; तुकाराम हेगडे; चंद्रकांत रुपेकर; कविताताई निकम; फिरोझ शेख; राजू पांचाळ; जोनभाई सांडेवाल; सारिकताई सकपाळ ; राजू कवंदर; लक्ष्मी अम्मा देवेंद्र; माधव कट्टार यांच्यासह शेकडो पीपल्स रिपब्लिकन महाराष्ट्र च्या कार्यकर्त्यांनी रिपब्लिकन पक्षा मध्ये जाहीर प्रवेश केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जीवन जाधव यांनी आपल्या समर्थकांसह आज रिपब्लिकन पक्षात केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांचे आशिर्वाद घेऊन यांच्या उपस्थितीत रिपब्लिकन पक्षात जाहीर



प्रवेश केला. प्राध्यापक जोगेंद्र कवाडे यांच्या नेतृत्वातील पीपल्स रिपब्लिकन पक्षातून बाहेर पडून मिलिंद सुर्वे यांनी आपल्या नेतृत्वात पीपल्स रिपब्लिकन पक्षाचा वेगळा गट स्थापन केला होता. त्यांच्या नेतृत्वात मुंबई आणि राज्यातील अनेक पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते कार्य करीत होते. पीपल्स रिपब्लिकन पक्षाच्या एका गटाचे प्रमुख असणारे मिलिंद सुर्वे यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह आज रिपब्लिकन पक्षामध्ये ना.रामदास आठवले यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश केला.

त्याच बरोबर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जीवन जाधव आणि डॉ रश्मी जीवन जाधव यांच्या नेतृत्वात त्यांच्या अनेक सहकाऱ्यांनी आज केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे आशिर्वाद घेऊन रिपब्लिकन पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला. या जाहीर पक्ष प्रवेशाची घोषणा मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ना. रामदास आठवले यांनी केली. त्यावेळी त्यांनी रिपब्लिकन पक्षाचे अनेक छोटे मोठे गट आहेत. अनेक संघटना आहेत, अनेक आंबेडकरी विचारवंत चळवळीत कार्य करीत आहेत. आपले स्वतंत्रपणे आणि वेगवेगळे कार्य करणाऱ्या या छोट्या मोठ्या संघटना, गटांनी आणि पक्षांनी रिपब्लिकन पक्षामध्ये सामील होऊन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष व्यापक आणि मजबूत केला पाहिजे. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वात रिपब्लिकन पक्ष देशभर मजबूत होत आहे.

नागालँड आणि मणिपूर या दोन राज्यांमध्ये रिपब्लिकन पक्षाला मान्यता आहे. आता आणखी दोन राज्यात रिपब्लिकन पक्षाला मान्यता मिळाल्यास एकुण ४ राज्यात रिपब्लिकन पक्षाला मान्यता मिळेल. ४ राज्यात मान्यता असणाऱ्या पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळते. भाजप, काँग्रेस, बसपा, आणि आम आदमी पक्षानंतर रिपब्लिकन पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून लवकरच मान्यता मिळेल. त्या दृष्टीने आपले काम सुरू असल्याचे ना.रामदास आठवले यांनी सांगितले.

सद्या देशात ५ राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी रिपब्लिकन पक्षाला निवडणूक आयोगाने गन्ना किसान हे निवडणूक चिन्ह दिलेले आहे. आसाम, तामिळनाडू आणि केरळ या तीन राज्यांत रिपब्लिकन पक्षाने आपले उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवले आहेत. पाँडिचेरी आणि पश्चीम बंगाल या दोन राज्यात रिपब्लिकन पक्षाचा पूर्णपणे भाजपला पाठिंबा आहे. आसाम, तामिळनाडू आणि केरळ मधील काही जागांवर रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार निवडणूक लढवणार असून उर्वरित जागांवर रिपब्लिकन पक्षाचा भाजपला पाठिंबा राहील.असे ना. रामदास आठवले यांनी यावेळी स्पष्ट केले.निवडणूक आयोगाने रिपब्लिकन पक्षाला मान्यता दिल्याने विविध राज्याच्या विधानसभा निवडणुकीत निवडणुका लढणे हे रिपब्लिकन पक्षाला क्रमप्राप्त आहे. त्यामुळे काहीं जागांवर रिपब्लिकन पक्षाने उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवले असून उर्वरित सर्व जागांवर रिपब्लिकन पक्षाचा भाजपला पाठिंबा राहणार आहे. असे ना. रामदास आठवले यांनी यावेळी जाहीर केले. यावेळी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर, राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे, मुंबई अध्यक्ष सिध्दार्थ कासारे, युवक आघाडीचे महाराष्ट्र अध्यक्ष पप्पु कागदे, जिल्हा अध्यक्ष संजय पवार आदि अनेक मान्यंवर उपस्थित होते.

**आखाती युध्दाच्या झळा भारतीयांना बसु नये म्हणुन इंधनावरील उत्पादन शुल्क कमी करण्याचा निर्णय लोकहिताचा - केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले**

आखाती देशात युध्दाचा भडका उडाला असताना त्या आखाती युध्दामुळे इंधनात दरवाढ होऊन भारतात महागाईचा भडका उडु नये याची खबरदारी यशस्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी घेतली आहे. पेट्रोल डिझेल या इंधनावरील उत्पादन शुल्क कमी करण्याचा केंद्र सरकारने घेतलेला निर्णय अत्यंत क्रांतीकारक लोकहिताचा निर्णय आहे, अशा शब्दात रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी इंधनावरील उत्पादन शुल्क कमी करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले आहे.

# गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर आडवलीत स्वामी समर्थ प्रगटदिन सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**आडवली प्रतिनिधी- गुरुनाथ तिरपणकर** : ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग) येथे गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर स्वामी समर्थ जनसेवा संस्था, आडवली तसेच अष्टगणकोट-श्री समर्थ गड यांच्या संयुक्त विद्यमाने श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रगटदिन सोहळा शुक्रवार, दिनांक २० मार्च रोजी अत्यंत उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.



पहाटे ब्रह्ममुहूर्तावर पारंपरिक विधीनुसार अभिषेक व पूजन सोहळ्याने कार्यक्रमांची सुरुवात झाली. पाणी, दूध, दही व पंचामृताद्वारे विधीवत अभिषेक करण्यात आला. यावेळी "शिव शंभो हर हर महादेव" तसेच स्वामी नामाचा अखंड जप सुरू होता.

श्री भाई महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पूजन विधी पार पडले. उपस्थित भाविकांनाही अभिषेक करण्याचा योग लाभला. सकाळी आरतीनंतर दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. सेवेकऱ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने दर्शन व्यवस्था राखत भाविकांना सहकार्य केले. दिवसभर "श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ" व "ॐ श्री स्वामीनाथाय नमः" अशा नामस्मरणाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

दुपारी आरतीनंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. पुरी, शिरा, जिलेबी, भाजी व वरण-भात अशा पंचपक्वान्नांचा प्रसाद भाविकांना देण्यात आला. संध्याकाळी आरतीनंतर रात्रीही महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. हजारो भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला.

प्रचंड गर्दी असूनही सेवेकऱ्यांनी उत्कृष्ट नियोजन करत सर्व व्यवस्था सुरळीत पार पाडली. अखंड भजन, नामजप आणि भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण परिसर आध्यात्मिक उर्जेने भारावून गेला. गुढीपाडव्याच्या निमित्ताने स्वामी भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

या सोहळ्यास श्री समर्थ मठ, अष्टगणकोट व समर्थ गड, घाडीवाडी येथील सेवेकरी, सुमारे २५० महिला सेवेकरी, घाडीवाडी तरुण मित्र मंडळ, जेष्ठ नागरिक, भाविक व भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. विश्वस्त मंडळींमध्ये श्री. अरविंद जाधव, श्री. संजीव सावंत, श्री. सुनील सावंत, श्री. रविंद्र नानचे, श्री. श्रीधर परब, श्री. सुरज कदम आदींची उपस्थिती होती. मठात सुमारे २५० महिला व २५० पुरुष सेवेकरी सातत्याने सेवा देत असून भाविकांसाठी शिस्तबद्ध दर्शन व्यवस्था करण्यात येते.भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सोहळ्यात सहभाग नोंदवत हा प्रगटदिन सोहळा अविस्मरणीय ठरल्याची भावना व्यक्त केली.

# ग्राम स्वच्छतेने खुटील रामवाडी येथे रामनवमी उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई वार्ताहर** : श्रीराम मंदिर ट्रस्ट (रजि.) खुटील-रामवाडी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली राम नवमी अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. या दिवसाचे औचित्य साधून श्रीराम मंदिरामध्ये दोन दिवस विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. श्री राम नवमी उत्सवाकरिता महाड, मुंबई, पुणे, गुजरात अशा विविध शहरासह पंचक्रोशीतील श्री रामाचे भक्तगणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रभु श्री रामाच्या मूर्तिपुढे नतमस्तक झाले होते. धार्मिक कार्यक्रमाने गावामध्ये सर्वत्र मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.

यंदाचे श्री राम जन्मोत्सवाचे 37 वे वर्षे मंडळाच्या शिस्तबद्ध आणि नियोजनात्मक संयोजनामुळे कार्यक्रमाने वेगळीच उंची गाठली. या निमित्ताने श्री सत्यनारायण महापूजा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येऊन दिवसभर श्री राम भक्तांनी एकच गर्दी केली असल्याचे पाहायला मिळाले. तसेच प्रभु श्रीराम उत्सवाचे औचित्य साधून ग्रामस्थांनी ग्राम स्वच्छता अभियान विशेष महत्व देऊन गावामध्ये सर्वत्र स्वच्छता अभियान राबविले.



या प्रसंगी महाड पंचायत सभापती प्रेरणा सावंत, जिल्हा परिषद सदस्य मन्सूर ताज, पंचायत समिती सदस्या सबिहा पाचकर, सदस्य संदीप खिडबिडे, माजी राजिप सदस्य जितेंद्र सावंत, माजी पंचायत समिती सदस्य पाचकर, दिलीप उकिर्डे, दुर्गेश सुतार, राहुल उकिर्डे, ऍड. राजेश देवळे, राहुल कदम, संजय रेशीम, नामदेव घाणेकर, बबन जाबरे, समीर रेवाळे, सचिन निर्मळ, विनायक तांबे, नरेश पिंगळे, प्रमोद पोटसुरे, संतोष म्हाके आदींसह पंचक्रोशीतील व विभागातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या उत्सवाला उपस्थिती लावली.सकाळी कलश प्रतिष्ठापना आणि वीणा पूजन करून श्री राम नवमी उत्सवास सुरुवात झाली. हभप बबन महाराज चव्हाण यांचे कीर्तन, महाप्रसाद, श्री सत्यनारायण महापूजा आणि प्रभू श्री रामाची पालखी मिरवणूक, हभप सचिन महाराज पालकर यांचा हरिपाठ, चांभारखिंड, मावळ, पुणे येथील झी मराठी फेम सुप्रसिद्ध कीर्तनकार हभप संगीताताई येनपुरे-चोपडे यांचे सुश्राव्य कीर्तन, विविध भजनी मंडळांची हरी जागर, दिंडी अशा भक्तिमय वातावरणात श्री रामांचा जन्म सोहळा मोठ्या भक्तिभावाने साजरा झाला. या निमित्ताने सर्वत्र मंगलमय वातावरण पसरले होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामीण अध्यक्ष सुरेश सुकूम, मुंबई अध्यक्ष एकनाथ सुकूम, राजेश सुकूम, कृष्णा सुकूम, सचिन घाणेकर, विजय कांदळेकर, प्रमोद कांदळेकर, निलेश सुकूम, सुनिल नाकते, चंद्रशेखर घाणेकर, सुशांत जऊल, शेखर कांदळेकर, श्रीराम मंदिर ट्रस्ट खुटील रामवाडी ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ, युवक मंडळ कार्यकारिणी सदस्य उस्तव कमिटी, मंडळाचे सर्व पदाधिकारी यांनी श्री राम उत्सव यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

# संघटन मजबुतीसाठी कार्यकर्त्यांनी कटिबद्ध व्हावे : सुरेश बनक

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:- योगेश पालोदकर** : सिल्लोड तालुक्यातील गोळेगाव खुर्द येथील श्री खोलेश्वर संस्थानच्या पवित्र परिसरात 'पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६' अंतर्गत आयोजित शिवना मंडळाचा दोन दिवसीय निवासी अभ्यास वर्ग नुकताच उत्साहात संपन्न झाला. या प्रशिक्षण वर्गाच्या दुसऱ्या दिवशी भाजपा प्रदेश चिटणीस तथा सिल्लोड-सोयगाव विधानसभा नेते सुरेश बनकर यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

मार्गदर्शन करताना सुरेश बनकर म्हणाले की, "संघटनात्मक बांधणीसाठी कार्यकर्त्यांमध्ये शिस्त आणि समाजाशी निरंतर संपर्क असणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने आपली जबाबदारी ओळखून संघटना अधिक सक्षम करण्यासाठी कटिबद्ध व्हावे." याप्रसंगी भाजपा अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी, विकास गायकवाड, मेघराज जी. चोंडीये, गजानन बोथरा आणि संतोष शिंदे यांची प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन लाभले.




या निवासी वर्गाचे वैशिष्ट्य म्हणजे यात 'एस. आय.आर.' प्रणाली संदर्भात कार्यकर्त्यांना महत्त्वपूर्ण तांत्रिक सूचना देण्यात आल्या. या तंत्रज्ञानामुळे आगामी काळातील संघटन कार्य अधिक प्रभावी आणि नियोजनबद्ध पद्धतीने करण्यासाठी कार्यकर्त्यांना निश्चित दिशा मिळाली आहे. विविध सत्रांमध्ये कार्यकर्त्यांनीही आपले अनुभव कथन करून सकारात्मक संवाद साधला.या अभ्यास वर्गामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवीन ऊर्जा, आत्मविश्वास आणि संघटनाप्रती असलेली निष्ठा अधिक दृढ झाल्याचे दिसून आले. कार्यक्रमाला शिवना मंडळातील लोकप्रतिनिधी, सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घार हिंडे आकाशी तिचे लक्ष पिलांपाशी : महेंद्रशेठ घरत

## शेलघरमध्ये २१ बाईकच्या एमजी ट्राफीचे झोकात उदघाटन

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी:** "माझ्या जडणघडणीत माझ्या शेलघर गावाचा मोलाचा वाटा आहे. एकेकाळचे शेलघर आणि आताचे शेलघर यात जमीन आस्मानाचा फरक आहे. आज माझे शेलघर गाव महाराष्ट्राच्या नकाशात सुनियोजित, स्वच्छ आणि बंगल्यांचे गाव म्हणून उदयास आले आहे. त्यासाठी मला खूप मेहनत घ्यावी लागली आणि अनेकांच्या विरोधालाही सामोरे जावे लागले; परंतु मी हार मानली नाही. म्हणूनच आजचे शेलघर सर्व सुविधांनी दिमाखात उभे आहे. त्यामुळे शेलघरचे नाव मोठे होण्यासाठी सर्वकाही करायला मी तयार आहे. त्यामुळेच गावातील युवकांनी माझ्याकडे २१ बाईकची प्रकाशझोतातील सामन्यांची कल्पना मांडली. त्याला मी लगेच होकार दिला. कारण आपले गाव हे गावच असते, तेथील आया-बहिणींची माया, प्रेम ही आपली शिदोरी असते. त्यामुळे त्या शिदोरीला विसरून चालणार नाही. शेवटी ग्रामस्थांच्या खांद्यावरूनच शेवटचा प्रवास आपल्याला करायचा असतो, याची मला जाणीव आहे. मी जरी आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगारांचे नेतृत्व करीत असलो तरी परदेशात असतानाही माझे गावाकडे बारीक लक्ष असते. 'घार हिंडे आकाशी तिचे लक्ष पिलांपाशी', अशी माझी अवस्था गावाबाबतीत होते. त्यामुळेच मी गावातील प्रत्येक सुख-दुःखात सहभागी होतोच. एमजी ट्राफीचे भव्य आयोजन करून तरुणांनी निश्चितच खेळाडूंना उत्तम संधी दिली आहे. त्याबद्दल सर्व



तरुणांचे अभिनंदन, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत एमजी ट्राफीच्या उदघाटनप्रसंगी म्हणाले. त्यांच्या हस्ते शुक्रवारी (ता. २७) रात्री झोकात उदघाटन झाले. यावेळी बॅंजो पथकाच्या तालावर आणि फटाक्यांच्या आतषबाजीत महेंद्रशेठ घरत आणि मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

यमुना सामाजिक शैक्षणिक संस्था आणि महेश स्पोर्टस शेलघर यांच्या वतीने शेलघरमध्ये शुक्रवारपासून एमजी ट्राफीचे आयोजन करण्यात आले आहे. २७ मार्च ते १ एप्रिलदरम्यान हे प्रकाशझोतातील टेनिस सामने होतील. सुमारे ५० संघ या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. त्यामुळे खेळाडूंना चक्क २१ बाईक जिंकण्याची अपूर्व संधी मिळणार आहे. त्यामुळे स्पर्धेची रंगत वाढली आहे. २१ बाईकचा रणसंग्राम पाहण्यासाठी क्रिकेट रसिक मोठ्या प्रमाणात हजर होते. त्यामुळे विजेत्या संघाच्या खेळाडूंची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

यावेळी रायगड जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनीष पाटील, ॲड. अविनाश ठाकूर, उद्योजक कुणाल घरत, गुलाबशेठ घरत, श्रीकांत घरत, उरण तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, कॉंग्रेसचे हेमराज म्हात्रे, निखिल ढवळे, देविदास म्हात्रे आणि एमजी ग्रुपचे सहकारी उपस्थित होते.

# व्यसनाविरोधात २५ वर्षांची लढाई; दिलीप आमले यांना “महारक्षक”चा बहुमान

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी :** समाजात व्यसनाचे विळखा अधिकच घट्ट होत असताना काही जिद्दी योद्धे मात्र या विषारी प्रवाहाविरोधात ठामपणे उभे आहेत. अशाच लढवय्या व्यक्तिमत्त्वाला अखेर योग्य तो सन्मान मिळणार असून, व्यसनमुक्तीच्या रणांगणात २५ वर्षे झटणारे समाजप्रबोधनकार दिलीप किसनराव आमले यांना “महारक्षक व्यसनमुक्ती पुरस्कार 2026” जाहीर झाला आहे.



नवी मुंबईतील रस्त्यांवर, चौकात, शाळा-कॉलेजांत आणि रिक्षा चालकांच्या स्टॅन्डवर व्यसनमुक्तीचा जाज्वल्य संदेश देणारे आमले हे नाव आता जनमानसात विश्वासाचे प्रतीक बनले आहे. दारू, गुटखा, मावा, सिगारेट यांसारख्या घातक व्यसनांविरोधात त्यांनी उभारलेली जनजागृती ही केवळ उपक्रम न राहता एक चळवळ ठरली आहे.

नवी मुंबई आर.टी.ओ. कार्यालय आणि सारथी सुरक्षा यांच्या पुढाकारातून हा पुरस्कार जाहीर करण्यात आला असून, महाराष्ट्राचे अप्पर परिवहन आयुक्त भरत कळसकर यांच्या हस्ते ३० मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता विष्णुदास भावे नाट्यगृह येथे हा सोहळा पार पडणार आहे.

“व्यसनमुक्ती हा केवळ विषय नाही, तर समाज वाचवण्याची लढाई आहे,” असा ठाम संदेश देत आमले गेली दोन दशके रिक्षाचालक, वाहनचालक आणि विद्यार्थ्यांमध्ये मोफत मार्गदर्शन करून जागृती करत आहेत. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि युनियनमध्ये त्यांनी राबवलेले कार्यक्रम अनेकांना नवजीवन देणारे ठरले आहेत.

दरवर्षी ३१ डिसेंबरला नेरूळ येथे आयोजित केला जाणारा व्यसनमुक्ती अखंड हरिनाम सप्ताह हा त्यांच्या कार्याचा जिवंत पुरावा आहे. नववर्षाच्या उंबरठ्यावर उधळपट्टी आणि व्यसनांच्या अंधारात बुडणाऱ्या समाजाला त्यांनी भानावर आणण्याचा धाडसी प्रयत्न केला आहे.

आजच्या घडीला व्यसनांच्या विळख्यात अडकणाऱ्या तरुणाईला वाचवण्यासाठी सरकार आणि यंत्रणा जिथे कमी पडताना दिसतात, तिथे आमले यांच्यासारखे कार्यकर्ते खऱ्या अर्थाने ‘महारक्षक’ ठरत आहेत.

या पार्श्वभूमीवर दिला जाणारा हा पुरस्कार म्हणजे केवळ सन्मान नाही, तर व्यसनाविरोधातील लढ्याला मिळालेली ताकद आहे.

आयोजकांनी सर्व नागरिक, रिक्षाचालक, सामाजिक कार्यकर्ते आणि मित्रपरिवाराने मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# सिल्लोड-सोयगाव 'बांधकाम कामगार सनियंत्रण समिती' गठित

## आमदार अब्दुल सत्तार अध्यक्ष; कामगारांच्या हक्कांना मिळणार बळ

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर सिल्लोड** :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या वतीने सिल्लोड –सोयगाव विधानसभा मतदारसंघासाठी 'बांधकाम कामगार स्थानिक सनियंत्रण समिती' अधिकृतपणे गठित करण्यात आली आहे. मंडळाचे जिल्हा कार्यकारी अधिकारी रा. बं. पाटील यांच्या स्वाक्षरीने या नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.



आमदार अब्दुल सत्तार | राजेंद्र ठोंबरे | मुनीब खान | दुर्गाबाई पवार | आशियाना कदीर शहा | दत्ता शेजुळ | विलास वराडे


> **"बांधकाम कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा जास्तीत जास्त लाभ मिळवून देणे हे आमचे मुख्य प्राधान्य राहील. त्यांच्या हक्कांचे कायदेशीर संरक्षण करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी ही समिती प्रभावीपणे काम करेल."** — **अब्दुल सत्तार, (आमदार तथा अध्यक्ष, सनियंत्रण समिती)**

या महत्त्वपूर्ण समितीच्या अध्यक्षपदी आमदार अब्दुल सत्तार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समितीमध्ये पुरुष बांधकाम कामगार प्रतिनिधी सदस्य म्हणून राजेंद्र रामराव ठोंबरे, मुनीब खान आणि शोएब खान यांची, तर महिला बांधकाम कामगार प्रतिनिधी सदस्य म्हणून दुर्गाबाई पवार आणि आशियाना कादीर शहा यांची निवड करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त, बांधकाम क्षेत्रातील मालक प्रतिनिधी म्हणून दत्तात्रय हरिहरराव शेजुळ व विलास राजाराम वराडे यांचा समावेश करण्यात आला आहे. समितीचे सदस्य सचिव म्हणून कामगार उपायुक्त कार्यभार सांभाळणार आहेत.

सदर समिती स्थानिक पातळीवर बांधकाम कामगारांच्या विविध प्रश्नांवर उपाययोजना करणे, शासनाच्या ७० पेक्षा जास्त कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि कामगारांच्या कायदेशीर हक्कांचे संरक्षण करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. या समितीच्या स्थापनेमुळे मतदारसंघातील हजारो बांधकाम कामगारांच्या नोंदणीपासून ते लाभापर्यंतचे सर्व प्रश्न मार्गी लागण्यास मोठी मदत होणार आहे.

# प्रदूषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

स्विस संस्था आयक्युएअरने जागतिक प्रदूषणावर एक अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक आहे कारण या अहवालात भारत जगातील सहाव्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून मुंबई दिल्लीसह देशातील सर्वच महानगरे आणि मोठी शहरे प्रदूषणाच्या विळख्यात सापडली असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३४ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ७३०० शहरांची माहिती संकलित करण्यात आली. या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, मुंबई, बेगुसाराई, गुवाहाटी, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई यासारख्या मोठ्या आणि महत्वाच्या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले. स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन



जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची काय अवस्था झाली हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर येते. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई - दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम - विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल.



श्याम ठाणेदार

# उस की टरबूज; उन्हाळ्याच्या उष्णतेवर मात करण्यासाठी कशाचे रस सर्वोत्तम?

उन्हाळा सुरु होताच शरीराला हायड्रेट ठेवणं सर्वात महत्त्वाचं असते. मात्र, शरीरातील पाण्याची गरज केवळ पाण्यानेच पूर्ण होत नाही. कारण पाण्यासोबतच शरीराला सोडियम आणि पोटॅशियमचीही आवश्यकता असते. यामुळे शरीरातील इलेक्ट्रोलाइट्सचं संतुलन राखलं जातं. उष्णतेमुळे घाम आल्यावर शरीरातील सोडियमचे प्रमाण कमी होऊ लागते. यामुळे शरीराला हायड्रेट ठेवण्यासाठी देशी पेय प्रभावी ठरू शकतात. सामान्यता लोकांना वाटते की हायड्रेशनसाठी नारळाचं पाणी सर्वोत्तम पेय आहे. यामुळे कडक उकाड्यावर मात करण्यासाठी आणि तहान भागवण्यासाठी काय प्यावं याबद्दल आपला संभ्रम होणे स्वाभाविक आहे. शरीराला आवश्यक हायड्रेशन आणि इलेक्ट्रोलाइट्स पुरविण्यासाठी उसाचा रस की तरबूजचा रस पिणे आवश्यक आहे ते पाहूया...



**कोणते चांगले आहे?**

उसाचा रस आणि टरबूज या दोन्हीमधील पोषक घटक आपल्या स्थानिक हवामानासाठी अगदी योग्य आहेत. शरीर थंड ठेवण्याच्या बाबतीत या दोन्हींचे वैशिष्ट्यपूर्ण फायदे आहेत. एक रस त्वरित ऊर्जा देतो, तर दुसरा शरीरातील पाण्याचे प्रमाण दीर्घकाळ टिकवून ठेवण्यास मदत करतो. तुमच्या आरोग्याच्या स्थितीनुसार आणि दैनंदिन दिनचर्येनुसार कशाची निवड करावी हे समजून घेतल्यास, तुम्हाला उन्हाळा निरोगीपणे घालवण्यास मदत होईल.

**कशाचे फायदे जास्त आहेत?**

ऊसाचा रस आणि टरबूजाचा रस या दोन्हींच्या पौष्टिक मूल्यांविषयी, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (ICMR) आणि राष्ट्रीय पोषण संस्था (NIN) यांनी बरीच महत्त्वाची माहिती दिली आहे.

उसाचा रस हे नैसर्गिक साखर आणि अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असलेले पेय आहे. ते शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यास आणि पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करते.

दुसरीकडे, टरबूजच्या रसात ९० टक्क्यांहून अधिक पाणी असते. त्यात व्हिटॅमिन ए, सी आणि लायकोपीन असतात, जे त्वचेची चमक आणि हृदयाचे आरोग्य सुधारण्यासाठी ओळखले जातात. ही दोन्ही पेये उष्माघातापासून आराम देण्यासाठी उत्तम असली तरी, ती शरीरात वेगवेगळ्या प्रकारे कार्य करतात.

**कोण काय पिऊ शकतो?**

शरीराचे तापमान आणि आर्द्रता टिकवून ठेवण्याच्या बाबतीत या दोन्हींमधील फरक विविध वैज्ञानिक अभ्यासांमधून स्पष्ट होतो. 'एनव्हायर्नमेंटल सायन्स अँड इंजिनिअरिंग' या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, मध्यम तापमानात उसाचा रस प्यायल्याने त्यातील पोषक तत्वे कमी न होता शरीराला त्वरित ताजेपणा मिळतो.

यामुळे त्वरित ऊर्जा मिळते, विशेषतः उन्हात कठोर परिश्रम करणाऱ्यांसाठी. त्याचबरोबर, शरीरातील पाण्याची पातळी टिकवून ठेवण्यासाठी टरबूजचा रस हा एक उत्तम मार्ग आहे. 'कोरियन जर्नल ऑफ फूड सेफ्टी'मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, टरबूजमधील पाण्याचे उच्च प्रमाण उन्हाळ्यातील निर्जलीकरण टाळते आणि शरीराला दीर्घकाळ थंड ठेवते.


शरीराच्या गरजेनुसार काय निवडावे याबद्दल स्पष्टता असणे महत्त्वाचे आहे. उन्हात लांब चालून आल्यावर किंवा कामानंतर खूप थकल्यावर उसाचा रस ऊर्जा वाढवण्यासाठी एक उत्तम पर्याय ठरू शकतो. घामातून कमी झालेल्या खनिजांची भरपाई ते लगेच करेल. पण जर तुम्हाला फक्त तहान भागवायची असेल आणि शरीरातील उष्णता कमी करायची असेल, तर टरबूजचा रस हा एक उत्तम पर्याय आहे. तो शरीरातील दाह कमी करतो आणि त्वचेला कोरडे होण्यापासून वाचवतो. कोणत्याही परिस्थितीत, स्वच्छ पद्धतीने तयार केलेला रस पिणे आरोग्यासाठी चांगले असते.

# चाळीशीतील आरोग्याच्या समस्या: तज्ज्ञांच्या मते ‘ही’ खबरदारी आवश्यक

जसजसे वय वाढते जाते, तसतसे शरीरात अनेक बदल होतात. ज्या गोष्टी तोपर्यंत सामान्य वाटतात, जेव्हा पर्यंत त्या सामान्य असतात. मात्र, एकदा काय आरोग्यविषयक समस्या उद्भवल्या तर निरोगी राहाणे अनेकांसाठी कठीण होते. आरोग्य देखील खूप मौल्यवान आहे. म्हणूनच, संपत्तीसोबतच तुम्ही तुमचे आरोग्याचीही काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. वयाच्या चाळीशीत पोहोचल्यावर तुमचे उत्पन्न किंवा संपत्ती कितीही असली तरी, जर तुम्ही आजारी पडलात, तर तुम्हाला मनःशांती मिळणार नाही. म्हणूनच, तज्ज्ञांच्या मते, त्या काळातील खऱ्या ऐषोरामासाठी काही गोष्टी महत्त्वाची भूमिका बजावतात. चला तर मग, त्या कोणत्या गोष्टी आहेत ते जाणून घेऊया.

वेदनामुक्त शरीर: लहानपणापासूनच लोक अनेक कामांमध्ये व्यस्त असल्यामुळे आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. याचे परिणाम वयाच्या चाळीशीपासून दिसू लागतात. मात्र, या काळात गुडघे, सांधे किंवा पाठीत वेदना होत नसल्यास, शरीर हे इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा अधिक मौल्यवान मानले जाऊ शकते.

हार्मोन्सचे संतुलन: कुटुंब वाढवताना आपल्याला अनेक अडचणी आणि नुकसानीचा सामना करावा लागतो. अशा वेळी, अनावश्यक तणावामुळे हार्मोन्सचे संतुलनही बिघडते. आपल्या मनाच्या सामर्थ्यामुळे आणि शांततेमुळे हार्मोन्स संतुलित राहतात. मानसिक चढ-उतार



नसल्यास, जीवनाचा दर्जाही वाढतो.

शांत झोप: वाढत्या वयानुसार सहज झोप लागण्याची आणि रात्रभर गाढ झोपेत राहण्याची क्षमता कमी होते. अशा वेळी झोप लागणे हे एक वरदान आहे. चांगली झोप शरीराला पुनरुज्जीवित करते. मेंदूची कार्यक्षमता सुधारते. ही झोप सौंदर्योपचारांपेक्षाही अधिक चांगल्या प्रकारे शरीर आणि चेहरा उजाळते.

योग्य पचन: जसजसे वय वाढते, तसतसे अनेक समस्यांमुळे आहारावर नियंत्रण ठेवावे लागते. वजन वाढण्याची आणि पचनाच्या समस्यांची भीती न बाळगता खाऊ शकणे हे एक वरदान आहे. चांगल्या आहारामुळे होणारी चयापचय क्रिया रोगप्रतिकारशक्ती वाढवते. मध्यम वयात पोषण अधिक प्रभावी ठरते. स्टॅनफोर्ड मेडिसिनच्या एका अभ्यासात असं म्हटलं आहे की, तुम्ही सध्या जे अन्न खाता त्याचा थेट परिणाम हृदयरोग, मधुमेह आणि ऑस्टिओपोरोसिस यांसारख्या दीर्घकालीन आजारांच्या धोक्यावर होतो.

दिवसभरची ऊर्जा: जसजसे आपण मध्यमवयात पोहोचतो, तसतशी आपली ऊर्जा पातळी नकळतपणे कमी होऊ लागते. मात्र, दिवसभर थकलेले बसून न राहता काम करण्याची, चालण्याची, इतरांना भेटण्याची आणि जीवनाचा आनंद घेण्याची ऊर्जा हीच खरी संपत्ती आहे.

आतून चमकणारी त्वचा: सौंदर्य हे संपत्तीचाच एक भाग आहे. ते केवळ शारीरिकच नव्हे, तर मानसिकही असले पाहिजे. खरी चमक आपण वापरत असलेल्या क्रिम्समुळे येत नाही. तर चांगला आहार, पाणी, झोप आणि निरोगी जीवनशैलीमुळे त्वचेला नैसर्गिकरित्या चमक येऊ शकते.

मनःशांती: जे लोक नेहमी घर आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांच्या ओझ्याखाली दबलेले असतात, त्यांच्यासाठी चाळीशीत विश्रांतीची वेळ येते. परंतु, त्याच वेळी उद्भवणाऱ्या आरोग्य समस्यांमुळे अनेकांची मनःशांती भंग होते. म्हणून, हे लक्षात ठेवले पाहिजे की, शांत मनामुळे आरोग्यही चांगले राहते.

अर्थपूर्ण नातेसंबंध: आपल्याला समजून घेणाऱ्या, प्रोत्साहन देणाऱ्या आणि आपल्यासोबत असणाऱ्या काही मोजक्या लोकांसोबत नातेसंबंध चांगले असणे खूप महत्त्वाचे आहे. चांगले नातेसंबंध माणसाला आणि मनाला अधिक मजबूत बनवतात.

खबरदारी महत्त्वाची आहे: हे साध्य करण्यासाठी, ज्याप्रमाणे आपण ऐषआरामाच्या जीवनासाठी प्रयत्न करतो, त्याचप्रमाणे आपल्याला आपल्या आरोग्याचीही काळजी घेणे आवश्यक आहे. जेव्हा या दोन्ही गोष्टी एकाच वेळी जपल्या जातात, तेव्हाच जीवन सुरळीतपणे चालते.